MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक १२ / डिसेंबर २०१५

## संपादकीय

### भारताचा कला इतिहास आणि सांस्कृतिक वसाहतवाद

सन १८५१ मध्ये लंडनच्या हाईड पार्कमध्ये एक प्रचंड औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात आले होते (१ मे ते ११ ऑक्टोबर १८५१). इंग्लंडची प्रसिद्ध राणी व्हिक्टोरिया हिचे पती राजे अल्बर्ट यांच्या पुढकाराने हे प्रदर्शन भरले होते. इंग्लंडमध्ये औद्योगिकीकरणाने बराच मोठ्ठा वेग घेतला होता आणि रेल्वे, छपाईपासून अनेक शास्त्रीय उपकरणांची निर्मिती इंग्लंडमध्ये याचसुमारास चालू झाली होती. मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गही याचवेळी इंग्लंडमध्ये निर्माण होत होता. ईस्ट इंडिया कंपनीने भारतामध्ये आपली सत्ताही चांगलीच बळकट केली होती. इंग्लंडच्या या औद्योगिक प्रगतीचे प्रदर्शन करणे हाच या प्रदर्शनाचा मूळ हेतू होता. भारतासारख्या वसाहती आणि अमेरिका आणि युरोपमधील सुमारे ४४ राज्यांनी या प्रदर्शनात भाग घेतला होता. औद्योगिक उपकरणांबरोबरच या प्रदर्शनामध्ये मोठ्या प्रमाणावरती कलात्मक वस्तूही ठेवल्या होत्या. यामध्ये भारताच्या 'कोहिनूर' हिऱ्याचाही समावेश होता. १८५० च्या लाहोर करारामुळे हा हिरा इंग्लंडच्या राजघराण्यांत हस्तांतरित झाला होता. चार्ल्स डिकन्स (Charles Dickens), लेविस कॅरॉल (Lewis Caroll), जॉर्ज ईलिऑट (George Eliot), अल्फ्रेड टेनिसन (Alfred Tennyson) आणि चार्ल्स डार्विन (Charles Darwin) सारख्या शास्त्रज्ञ, विचारवंत आणि लेखकांनी या प्रदर्शनाला भेट दिल्याच्या नोंदी आहेत. कार्ल मार्क्स (Karl Mars) यांनी मात्र या प्रदर्शनाला विरोध केला होता. या प्रदर्शनाची वास्तू आणि त्याची अंतर्गत सजावट हे ब्रिटिश स्थापत्य-कलेचेही एक मोठे प्रदर्शन होते. या प्रदर्शनामुळे सरकारला लाखो पौंडांचा फायदा झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पैशांतून कुठलाही नवीन उद्योगधंदा न उभारता, व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट, विज्ञान (Science) आणि नॅचरल हिस्टरी म्युझियम अशी आजची जगप्रसिद्ध कला आणि विज्ञान प्रदर्शित करणारी संग्रहालय (Museums) यातून निर्माण केली गेली.

व्यापार, उद्योग आणि साहित्यापासून चित्रकलेपर्यंतच्या सर्व कलांच्या निर्मितीमध्ये फ्रान्स आणि इंग्लंड या युरोपमधील दोन देशांमध्ये स्पर्धा होती. १८४४ मध्ये फ्रान्समध्येही अशाच औद्योगिक वस्तूंच्या निर्मितीला प्रसिद्धी देण्याकरता एक मोठे प्रदर्शन भरले होते. इंग्लंडमध्ये भरवले गेलेले प्रदर्शन हे त्या स्पर्धेचाच एक भाग होता.

'कला' हा कुठल्याही संस्कृतीचा किंवा सभ्यतेचा आत्मा असतो. साहित्य, स्थापत्य, शिल्प, नाट्य, नृत्य, संगीत ते अगदी चित्रकलेपर्यंत वेगवेगळ्या माध्यमांतून त्या त्या संस्कृतीची 'सृजनता' कलेमधून व्यक्त होत असते. यातून जे निर्माण होते त्यालाच आपण 'संस्कृती' म्हणतो. जगातल्या सगळ्या प्राचीन सभ्यतांनी आपापली संस्कृती निर्माण केली. आश्चर्याची

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

गोष्ट म्हणजे या सगळ्या सभ्यतांच्या कला, या आपली एक वेगळी 'शैली' घेऊनच प्रदर्शित होतात. पाश्चात्य जगताकरता 'ग्रीक' आणि 'रोमन' कलांनी त्यांना स्फूर्ती दिली आहे. म्हणूनच या कलांच्या निर्मितीमध्ये, त्यांच्या चालिरिती, वेशभूषा, भौतिक-आधिभौतिक तत्त्वज्ञानाच्या समजुती यांचे प्रतिबिंब दिसते. आफ्रिकन किंवा दक्षिण अमेरिकेतील इन्का (Inca) किंवा मायन (Mayan) कलांमध्येही त्या त्या संस्कृतींचेच प्रतिबिंब दिसते. भारतीय कलाही याला अपवाद होऊ शकत नाहीत. सभ्यता जशी विकसित होत जाते, तसे या कलांचे 'शास्त्र' बनायला लागते, आणि त्यातूनच पुढे त्याच्या साहित्याची निर्मिती होते.

भारत हा एक 'अती प्राचीन' देश आहे. साहजिकच एवढ्या मोठ्या कालखंडामध्ये अनेक अंगांनी आणि अनेक स्तरांवर भारतीय कलांचा विकास झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अगदी आपले भौगोलिक वैशिष्ट्य जपूनसुद्धा, अफगाणिस्तानपासून केरळपर्यंत या कलांच्या निर्मितीचा गाभा मात्र आपल्या भौतिक आणि आधिभौतिक तत्त्वज्ञानाशी सुसंगत राहिला आहे. चीनपासून मध्य आणि पूर्व आशिया खंडातील सर्वच देशांच्या कलांवरती भारताचा प्रभाव दिसून येतो. तरीही दुर्दैवाने भारतीय कलांचा जेव्हा पाश्चात्य कलेशी तुलनात्मक अभ्यास होतो, तेव्हा भारतीय कलांना ग्रीक आणि रोमन कलांपुढे दुय्यम स्थान मिळते. १८५१ च्या लंडनमधील प्रदर्शनामुळे पुन्हा एकदा अशा चर्चांना सुरुवात झाली.

भारतीय कलांचा 'स्रोत' आणि 'उगम' हा किती भारतीय आहे, आणि त्याच्या 'शैली'मध्ये किती उसनवारी आहे, याच्या अभ्यासाकरता पाश्च्यात्यांनी या कलांच्या मूळ ग्रंथाच्या शोधाला सुरुवात केली. बहुतेक सर्व मूळ ग्रंथ हे संस्कृतमध्ये आहेत. सुदैवाने याचवेळी पाश्चात्यांच्या संस्कृतच्या अभ्यासानेही गती घेतली होती. तरीही 'ग्रीक' किंवा 'रोमन' संस्कृती इतक्या तुल्यबळ संस्कृती जगात अस्तित्वात असू शकतात, ही कल्पना तेव्हा आणि आजही गंभीर अभ्यासकांच्याही पचनी पडायला जड जाताना दिसते. याचवेळी भारतामध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होऊ लागला होता. यातूनच युरोपमधील 'वैज्ञानिक' आणि 'औद्योगिक' क्रांतीची जाणीव भारतीयां मध्येही पाझरू लागली होती. हीच 'सांस्कृतिक वसाहतवादाची'ही सुरुवात होती. ख्रिस्ती धर्मप्रसारक हिंदू धर्मातील वैगुण्ये हिरिरिने मांडत होते. सुधारणेच्या नावाखाली भाषा, वेश ते व्यवहारातील सांस्कृतिक नीतिमूल्यांवरही पाश्चात्य संस्कृतीचे 'रोपण' व्हायला लागले. यात सर्वात मोठा बळी हा स्थापत्य, संगीत, नृत्य आणि इतर कलांचा दिला गेला.

चांगल्याचा स्वीकार करण्याकरता कुठलीच आडकाठी येऊ नये. युरोपमध्ये झालेल्या प्रबोधनामुळे (Renaissance) तेथील कलांना चर्चच्या जोखडातून मुक्ती मिळाली. पण हे 'प्रबोधन' म्हणजे 'आत्मवंचना' नव्हती; तर हे प्रबोधन म्हणजे मूळ 'स्रोत', म्हणजेच 'ग्रीक' आणि 'रोमन' विचार, आणि तत्त्वज्ञानाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न होता. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्येही महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर ते विवेकानंद आणि अरविंदोंचा प्रयत्नही सुधारणांमध्ये 'भारतीयत्व' जपण्याकडे होता. भारतीय कलांच्या बाबतीत कला-इतिहासकार आनंद कुमारस्वामी यांचे प्रयत्न हे विशेष उल्लेखनीय आहेत. तत्कालीन इंग्रजी शिक्षित भारतीयांच्या बाबतीत त्यांचे निरीक्षण बोलके आहे.

"Speak to the ordinary graduate of an Indian University, or a student from Ceylon, of the ideas of the Mahabharata-he will hasten to display his knowledge of Shakespeare; talk to him of religious philosophy-you find that he is an atheist of the crude type common in Europe a generation ago, and that not only has he no religion, but is as lacking in philosophy as the average Englishman; talk to him of Indian music-he will produce a gramophone or a harmonium and inflict upon you one or both; talk to him of Indian dress or jewellery-he will tell you that they are uncivillised and barbaric; talk to him of Indian art-it is news to him that such a thing exist; ask him to translate for you a letter written in his own

(पृष्ठ क्र. ४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष सोळावे / अंक १२ / डिसेंबर २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | ग्रीनिच भूमध्य रेखा | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध-२ सिक्कीम (भाग : २) | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : २२) | श्री. अरविंद ओक | १३ |
| ५) | निगराणी ... | सौ. रागिणी केळस्कर | २० |
| ६) | ओळख वनस्पतींची-कौसी | श्री. प्रकाश दुधलकर | २२ |
| ७) | साठोत्तरी कवींच्या कवितेतील मृत्यू-जाणीव | डॉ. प्रतिभा टेंबे | २४ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# ग्रीनिच भूमध्य रेखा
## (Greenich Mean Line)

*लंडनजवळच्या ग्रीनिचमध्ये असलेली भूमध्य रेखा हे भौगोलिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. या ठिकाणाला भेट देऊन आलेले अनुभव या लेखात विशद केले आहेत - संपादक*

महाराष्ट्रातील काही विद्यार्थ्यांना घेऊन आम्ही इंग्लंडला गेलो होतो. इंग्लंडमधील विद्यापीठे, वस्तुसंग्रहालये, वाचनालये आणि प्रेक्षणीय स्थळे दाखविण्याचा आमचा प्रयत्न होता. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या दोन शहरांना भेटी देऊन आमचा चमू लंडनमध्ये दाखल झाला. जगाचे आर्थिक केंद्र अशी लंडनची ख्याती आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे येथे अनेक प्रसिद्ध ठिकाणे आहेत. त्यातील सर्वात प्रसिद्ध ठिकाण म्हणजे ग्रीनिचची भूमध्य रेखा. नावाप्रमाणेच हे ठिकाण ग्रिनीच या परिसरात आहे. पूर्वीच्या काळी ग्रीनिच हे लंडन शहराच्या बाहेर वसलेले एक लहानसे खेडे होते. आकाश-निरीक्षण करण्यासाठी सोयीचे होईल म्हणून या खेड्यात रॉयल ऑब्झर्वेटरी (Royal Observatory) स्थापन करण्यात आली. टायको ब्राहो, जोहानेस केपलर, एडमंड हॅले अशा प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञांनी येथून आकाशाचे निरीक्षण केले. वाढत्या वस्तीमुळे ग्रीनिचचे खेड्याचे रूप जाऊन त्याला लहानशा गावाचे रूप आले. कालांतराने ते लंडनचे उपनगर म्हणून ओळखले जाऊ लागले. आता तर ग्रीनिच हा लंडन शहराचाच भाग झालेला आहे. वस्ती जशी वाढत गेली तसा आजूबाजूचा रात्रीचा प्रकाशही वाढत गेला. त्यामुळे रॉयल ऑब्झर्वेटरी केंब्रिजला नेण्यात आली. तिथे अनेक वर्षे काम केल्यानंतर ऑक्टोबर १९९८ मध्ये ती बंद करण्यात आली. कारण दूरदर्शीचा वापर करून आकाश-निरीक्षण करण्याचे दिवस आता संपलेले आहेत. असे जरी असले तरी ग्रीनिच येथील स्थळाला अजूनही ऐतिहासिक महत्त्व आहे. कारण तेथे जगाची भूमध्य रेखा आखलेली आहे. या स्थळाला भेट दिल्याखेरीज लंडनची सहल पूर्ण होत नाही.

आज आपल्याला भूमध्य रेखा प्रत्यक्ष पाहायला मिळेल म्हणून सर्वच विद्यार्थी आनंदात होते. नेहमी उशीरा येणारे विद्यार्थी देखील त्यादिवशी वेळेच्या आधी आले. ठरलेल्या वेळेस आम्ही आमच्या राहत्या ठिकाणापासून प्रयाण केले. या ठिकाणापासून ग्रीनिचचे अंतर बरेच आहे. लंडन भुयारी रेल्वे मार्गाच्या नकाशाचे निरीक्षण करून आम्ही ग्रीनिचला पोहोचण्याचा एक मार्ग ठरविला. त्यानुसार जवळच्या भुयारी स्टेशनवर जाऊन आम्ही गाडी पकडली. नकाशानुसार असे लक्षात आले की कोणतीही भुयारी गाडी ग्रीनिचला जात नाही. तेथे जाण्यासाठी डॉकलँड लाईट रेल (DLR) नावाची जमिनीवरून जाणारी गाडी पकडावी लागते. ती जिथून सुरू होते तिथपर्यंत भुयारी गाडीने जायचे आम्ही ठरविले. शेवटी बँक नावाच्या स्थानकापर्यंत भुयारी गाडीने जाऊन तिथे आम्ही डीएलआर गाडीत बसलो. गाडी कसली! जोड बसच म्हणाना. दोन डब्यांची ती गाडी, जमिनीवर पूल बांधून तिच्यावर ही गाडी चालवतात. चालकरहित ही गाडी आहे. तिचे नियंत्रण केंद्रीय नियंत्रण कक्षातून होते. गरज पडलीच तर असो म्हणून एक गाडी-निरीक्षक तिथे असतो. चालकाविना चालणारी गाडी पाहून विद्यार्थ्यांना मजा वाटली. त्यातले सर्वजण पुढच्या बाकावर बसण्यासाठी धडपडू लागले. या ठिकाणी बसून वळणदार रस्त्याने जाणारी छोटीशी गाडी पाहण्यातला आनंद काही औरच होता. जमिनीवर चालणारी गाडी जमिनीखाली जाऊ लागली तेव्हा आपले उतरण्याचे ठिकाण जवळ आल्याचे आमच्या लक्षात आले. यापुढे गाडी थेम्स नदीच्या खालून जाणार होती!

---

परिस्थितिला शरण न जाता परिस्थितीवर मात करा.



**रॉयल ऑब्झर्वेटरीचे दुरून दर्शन**

ग्रीनिच हे गाव थेम्स नदीच्या किनाऱ्यावर दुसऱ्या बाजूला वसलेले आहे. तेथे पोहोचण्यासाठी भुयारी रेल्वेचा नदीखालून रस्ता बांधावा लागला. १० वर्षांपूर्वी ही सोय नव्हती. तेव्हा नदीच्या उत्तर किनाऱ्यावर पायवाटेने जावे लागे. प्रवासाच्या दरम्यान ही माहिती आम्ही मुलांना दिली तेव्हा 'आम्हाला पायवाटेने जायचे आहे' अशी इच्छा बऱ्याच विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. बरेच अंतर पायी चालावे लागेल याची त्यांना कल्पना दिली होती. तरी नदीखालची पायवाट पाहण्याची इच्छा असल्याने पायी चालण्याची तयारी त्यांनी दाखविली होती. म्हणून आम्ही ग्रीनिच स्टेशनच्या आधीच्या स्टेशनवर डीएलआर गाडीतून बाहेर पडलो. स्टेशनच्या बाहेर येतातच 'कट्टी सार्क' (Cutty Sark)। अशी पाटी दिसली. त्या दिशेने थोडे पुढे गेल्यावर थेम्स नदीचे विस्तीर्ण पात्र आम्हाला दिसले. त्यात भरपूर पाणी होते. नदीकडे पाहात पाहात आम्ही पायवाटेपर्यंत आलो. तेथे एक मोठी अगडबंब लिफ्ट होती. त्या लिफ्टने आम्ही सुमारे २०० फूट खाली गेलो. लिफ्टचे दार उघडताच आम्हाला नदीखालून जाणारी वाट दिसली. वाट अगदी कोरडी होती. तेथे भरपूर दिवे लावून पुरेसा उजेड निर्माण केला होता. वळणावर पुढचे दृश्य दिसावे यासाठी बहिर्वक्र आरसे लावले होते. साधारणपणे अर्धा तास तरी आम्ही बोगद्यातून चालत होतो. पुढच्या टोकाला पोहोचतो तो तिथे एक लिफ्ट आमची वाट पाहात होती. लिफ्टने वर गेलो तर लक्षात आले की आपण नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचलो आहोत.

लिफ्टच्या बाहेर पडतात 'रॉयल आब्झर्वेटरी' (Royal Observatory) अशी पाटी आम्हाला दिसली. त्यात दाखविलेल्या दिशेने आम्ही चालू लागलो. लवकरच आम्ही एका प्रशस्त अशा पटांगणात आलो. सर्वत्र हिरवळ होती. मध्येमध्ये मोठमोठी झाडे लावली होती. या झाडांच्या आड प्रयोगशाळा झाकून गेली होती. परंतु ती टेकडीवर असल्याने त्याचे वरचे टोक आम्हाला दिसत होते. सिमेंटने बांधलेला एक उंच खांब आणि त्यात अडकलेला मोठा गोळा असे दृश्य लांबून दिसत होते. जसजसे आम्ही जवळ गेलो तसतसे प्रयोगशाळेची इमारत दिसू लागली. टेकडीवर असलेली लाल विटांची इमारत मागच्या ढगांच्या पार्श्वभूमीवर फारच सुंदर दिसत होती. चढ चढून जायचे होते तरी आम्ही पळत पळत त्या इमारतीजवळ गेलो. कधी एकदा भूमध्य रेषेवर पाय ठेवतो असे आम्हाला झाले होते. भूमध्य रेखा पाहताच आम्हाला धन्य झाल्यासारखे वाटले.



**भूमध्य रेखा**

ऑब्झर्वेटरीच्या पुढे टेकडीवरच ही रेषा आखलेली आहे. खरे तर जमीन खोदून खाच पाडली आहे. त्यावर रंगीत काच ठेवलेली आहे. रात्रीसुद्धा स्पष्ट दिसावी यासाठी काचेखाली विद्युत दिवे लावलेले आहेत. या रेषेने पृथ्वीगोलाचे दोन भाग होतात; एक पश्चिम गोलार्ध आणि दुसरा पूर्व गोलार्ध. या रेषेपासूनच रेखांशाचे मोजमाप केले जाते. एखादे ठिकाण ग्रीनिच रेषेपासून किती अंतरावर आहे हे दाखविण्यासाठी पृथ्वीगोलाचे ३६० अंशात विभाजन केले आहे. स्थळ जर रेषेच्या पूर्व बाजूला असेल तर तेथील रेखांशाचा आकडा आणि पूर्व दिशा असे

जगामध्ये कोणतीही वस्तू चांगली किंवा वाईट असत नाही. आपले विचारच ती वस्तू चांगली किंवा वाईट बनवतात– शेक्सपिअर

सांगतात. जसे मुंबईचे स्थान ७२° पूर्व असे सांगितले जाते. भूमध्य रेषेच्या दोन्ही बाजूला ग्रॅनाइटचे दगड लावलेले आहेत. पश्चिम बाजूला असलेल्या दगडावर पश्चिमेकडील शहरांचे म्हणजे न्यू यॉर्क, शिकागो, रियो द जानेरो, ओंटारिओ (कॅनडा), लिमा (पेरू) या शहरांचे रेखांश दाखविले आहेत. पूर्व बाजूला असलेल्या दगडावर मुंबई, नैरोबी, कोलालंपूर, सिंगापूर, बेजिंग, टोक्यो इत्यादी शहरांचे रेखांश दाखविले आहेत. ही रेषा दक्षिण टोकाला प्रयोगशाळेच्या इमारतीला मिळते. त्याच्या आत एक मोठी दुर्बीण आहे. त्या इमारतीच्या भिंतीवर Prime Meridian of the World (जगाची मुख्य भूमध्य रेखा) असे लिहिलेले आहे. त्याच्याच खाली अचूक वेळ दाखविणारे आधुनिक इलेक्ट्रॉनिक घड्याळ लावलेले आहे. या घड्याळात सेकंदाचे देखील भाग केलेले आहेत. सोयीसाठी संपूर्ण इंग्लंडमध्ये उन्हाळ्यात घड्याळ एका तासाने पुढे करण्यात येते. परंतु येथील घड्याळ मात्र ग्रीनिच वेळेप्रमाणे चालते. रेषेच्या उत्तर टोकाला पृथ्वीची प्रतिकृती आणि त्यात भूमध्य रेखा दाखविलेली आहे. यावरून भूमध्य रेषेचे नेमके स्थान आपल्याला कळते.



**भूमध्य रेषेवर विद्यार्थ्यांनी केलेली गर्दी**

भूमध्य रेखा दुरून पाहिल्यावर त्यावर उभे राहण्याची प्रत्येकालाच इच्छा होते. त्यामुळे रेषेवर सतत गर्दी असते. संधी साधून आमच्या चमूतील विद्यार्थ्यांनी रेषेच्या दोन्ही बाजूला पाय ठेवून आपले फोटो काढून घेतले. या अवस्थेत एक पाऊल पश्चिम गोलार्धात तर दुसरे पाऊल पूर्व गोलार्धात असते. हा खरोखरच टिपून ठेवण्यासारखा क्षण असतो. त्याबरोबर नोंद करावी अशी आणखी एक संधी तेथे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. भूमध्य रेषेच्या उत्तर टोकाला एक यंत्र ठेवले आहे. या यंत्रात एक पौंडाचे नाणे टाकले की एक प्रमाणपत्र छापून बाहेर येते. ह्या प्रमाणपत्रावर त्या संस्थेच्या संचालकाची स्वाक्षरी असून 'ही व्यक्ती अमुक अमुक वेळेला भूमध्य रेषेवर उपस्थित होती' असा मजकूर त्यात असतो. आपले नाव लिहिण्यासाठी तेथे मोकळी जागा सोडलेली असते. या यंत्रातून प्रमाणपत्र मिळविणे हा एक आनंदाचा क्षण म्हणावा लागेल. त्याहीपेक्षा आनंदाचा क्षण अनुभवायला मिळतो तो दुपारी बरोबर बारा वाजता. जसे घड्याळ १२ च्या ठोक्याकडे जाते तसे खांबावर असलेला गोळा वरवर सरकू लागतो. बरोबर १२ वाजता तो वरच्या टोकाला पोहोचतो आणि त्यानंतर सावकाश खाली येतो. याखेरीज १२ वाजले आहेत याची वर्दी देण्यासाठी भोंगा वाजतो. आम्ही आमची तिथे राहण्याची वेळ अशी आखली होती की गोळा वर जाऊन खाली येताना आम्ही पाहू शकलो. त्याचबरोबर भोंग्याचा आवाजही ऐकू शकलो. आमच्यापैकी बऱ्याच जणांकडे व्हिडियो कॅमेरा होता. त्यांनी या घटनेचे चलचित्र घेतले आहे. ग्रीनिच मध्यरेखेला दिलेली भेट एक संस्मरणीय भेट म्हणून आमच्या कायमचे लक्षात राहिल.



**दुपारी १२ वाजता वर गेलेला गोळा**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

# स्वदेशवेध-२
## सिक्कीम (भाग-२)

*सिक्कीम-दार्जिलिंग शहरांचे व लगतच्या परिसराचे प्रवासवर्णन करणाऱ्या लेखाचा दुसरा भाग प्रसिद्ध करीत आहोत*
*- संपादक*

सकाळी ४ वाजता उठून ४.३० ला आम्ही सगळ्यांनीच टायगर हिलकडे प्रस्थान केले. दार्जिलिंग-गोर्खा- हिल- कौन्सिलने बांधलेल्या बंद निवाऱ्यातील काचघरांतून सूर्यदर्शन आणि कांचनजंगा पर्वत उदयाचे विलोभनीय दृश्य पाहणे त्यामुळे शक्य होणार होते. त्या बंदिस्त निवाऱ्यात जो प्रथम पोहोचेल त्यासच बसण्यास जागा देतात. इतरांना कडाक्याच्या थंडीत बाहेर बसून वा उभे राहूनच सूर्योदय पाहावा लागतो. गेले तीन दिवस सतत दार्जिलिंगमधे पाऊस पडत असल्याने सूर्योदय पाहता आलेला नव्हता ही खबर आम्हाला होतीच. आज मात्र उघडीप होती. पावसाची मेहेरबानी होती. सकाळी सहाच्या सुमारास यथावकाश सूर्योदय आणि कांचनाप्रमाणे उजळलेले कांचनजंगा दोन्हीही मनसोक्त अनुभवता आले.

नंतर आम्ही हॉटेल आनंद पॅलेस दार्जिलिंग येथे जाऊन नास्ता केला. मग चहाच्या मळ्यात पारंपरिक पोशाखांत फोटोसत्र साजरे केले. त्यानंतर तेनझिंग खडकावर प्रस्तरारोहणाचा खास अनुभव घेतला. वरील प्रकाशचित्रात उजवीकडले वरचे चित्र 'तेनझिंग खडका'चे आहे, तर खाली 'पद्मजा नायडू प्राणी-उद्यान' तसेच हिमालयन-पर्वतारोहण-संस्था यांच्या प्रवेशद्वाराचे आहे. त्या संस्थेकडे मग आम्ही रवाना झालो.

प्रवेशद्वारापूर्वीच आमचे लक्ष वेधून घेतले ते एका डौलदार, उंचच-उंच, लाललाल फुलांनी बहरलेल्या एका सुंदर वृक्षाने. तो होता 'लाली गुरांच' म्हणजेच ऱ्होडोडेन्ड्रॉन. ही फुले अतिशय आरोग्यकारक मानली जातात. यांचा गुलकंदही केला जातो. आमच्या सिक्कीम प्रवासात मग अनेकदा हे वृक्ष आम्हाला दिसतच राहिले. मग दिसला एडका. एडक्याचा ए शिकलो त्याला आता



लाली गुरांच, तेनझिंग खडकावर प्रस्तरारोहण

४५ वर्षे उलटली आहेत. मात्र तेव्हापासून ते आजतागायतएडका नावाचा हाडामांसाचा प्राणी पाहिलेलाच नव्हता. आजच प्रथम पाहत होतो. शिवाय, त्यावेळेसही एडक्याचे पुस्तकात जे चित्र दिले जायचे त्यात दोन एडके परस्परांशी टक्कर घेतानाच दाखवलेले असत. इथे एकटा सुटा एडका, गवत खात उभा असलेला पाहून, चुकल्याचुकल्यासारखे वाटू लागले. इथेच आम्हाला आणखीही एतद्देशीय प्राणी भेटले. ते म्हणजे काळं अस्वल आणि याक.



लाल पांडा

लाल पांडा सिक्कीमचा राष्ट्रीय प्राणी समजला जातो. (१९७५ पूर्वी सिक्कीम हे एक स्वतंत्र राष्ट्रच होते.) त्याचीही भेट सरतेशेवटी या उद्यानातच झाली. उंच झाडाच्या

टोकावर तो राहात होता. आमच्या स्थिरचित्रण चित्रकाने तो पुरेसा आवाक्यात येईना. मग चलचित्रकवाले सरसावले. दूरवरच्या पांड्याला दृष्टीच्या पल्ल्यात आणला आणि प्रकाशचित्रे काढली गेली. पण ती पाहिल्यावर मात्र, तो त्याच्या ख्यातीप्रमाणेच रुबाबदार असल्याचे जाणवले.

मग जपानी पॅगोडा-मठ पाहायला आम्ही इथे आलो. मठाला हिंदू मंदिरांप्रमाणेच सिंहद्वार होते. वरच्या मजल्यावरील बुद्धमंदिरात आरती सुरू असताना आम्ही पोहोचलो. झाऱ्याच्या आकाराचे चामड्याचे तालवाद्य दांडीने हाती धरून त्यावर वेताच्या वळलेल्या काडीने 'ढुम' असा ताल धरून प्रत्येक भक्त पुढील मंत्र म्हणत असे. 'नमो म्यो हो रें गे क्यो ... ढुम.' मुख्य ढोल वाजवणारा कषायवस्त्रे नेसून एका मोठ्या ढोलापुढे बसून जाडशा ठोक्याने ढुम आवाज करत असे. आम्ही पर्यटकही जेव्हा आत गेलो तेव्हा त्याने आम्हाला भिंतीलगत ठेवलेली झारा-सदृश्य तालवाद्ये हाती घेण्यास सांगितली. ती घेऊन आम्ही त्या भक्तांसोबत खाली मांडी घालून बसलो. सुमारे पाच-दहा मिनिटे तोच मंत्र अत्यंत समरसून म्हटला. याचे पर्यवसान असे झाले की, मग पुढे बसमधेही वारंवार मजेने तो म्हटला जात असे.

तिथून निघालो ते आम्ही खडकावरले उद्यान ऊर्फ रॉक गार्डन बघायला गेलो. एका नैसर्गिक धबधब्याच्या दोहों बाजूस सुरेख पायऱ्या पायऱ्यांचे टप्पे बांधून सुंदर उद्यानाची रचना त्या धबधब्याच्या दुतर्फा केलेली होती. एका बाजूने वर चढून, हवे तर अधेमधे पुलांवरून तीर बदलत, आम्ही दुसऱ्या तीरावरून खाली उतरलो. हा सर्वच अनुभव अगदी प्रसन्न करणारा वाटला. उंच पर्वतावर वसलेले असल्याने गान्तोक शहर उंचसखल जमिनीवर बांधलेल्या घरांतून नांदते आहे. शेजारच्या घरी जायचे असेल तरी कित्येकदा शे-पन्नास पायऱ्या चढाव्या-उतराव्या लागतात.

मुख्य रस्ते अरुंद आणि वर्दळीचे होते. मारुती व्हॅन, अल्टो अशा प्रकारच्या चार चाकी वाहनांनाच केवळ टॅक्सी म्हणून वाहतूक करण्यास परवानगी होती. टॅक्सीत केवळ चारच प्रवासी बसू शकत. उतारचढावाचे रस्ते असल्याने एखादी टॅक्सी जरी उभी राहिली, तर रस्त्यातील वाहतूक तुंबून राही. याकरता रस्त्यांवर कुठेही टॅक्सी उभी करण्यास मनाई होती. टॅक्सी विवक्षित जागीच उभी करावी लागत असे. आमच्या हॉटेलचा एक गॅरेजसदृश गाळा प्रवेशद्वारानजीकच मोकळा सोडलेला होता. टॅक्सी बोलावली असता तिथेच उभी करत. रस्त्यावर नाही.

दार्जिलिंगमधे स्थलदर्शन करत असताना अनेकदा आम्ही घूम बुद्धमठासमोरून, स्थानकासमोरून जात असू. घुमून-फिरून पुन्हा त्याच त्याच जागेवर पोहोचत असल्यामुळेच त्या भागाचे नाव घूम पडले असावे असा माझा संशय त्यामुळे पक्का झाला. प्रत्यक्ष घूम मठाचे दर्शन मात्र २२ तारखेस दार्जिलिंगहून गान्तोक प्रवासास निघालो तेव्हा सकाळी सकाळीच घेतले. या मठाजवळ आम्हाला स्थानिक विणीच्या विविधरंगी आकर्षक लोकरीच्या शाली मिळाल्या. भावही माफकच होते. इथे केलेली सर्वच खरेदी उत्तम ठरली.

आम्ही ज्या हॉटेलात उतरलो होतो त्या सिक्कीम रिट्रीट हॉटेलचे प्रवेशद्वार डॉ.आंबेडकर रस्त्यावर तळमजल्यावर आहे. प्रवेशाशी उभे राहून हॉटेलकडे पाहिले असता ते दोन मजली भासते. आम्ही ज्या खोलीत राहिलो होतो त्या खोलीत जाण्याकरता स्वागत-कक्षापासून एक मजला खाली जावे लागे. खोलीतील खिडकीतून एक रस्ता दिसे. तो हॉटेलच्या पाठीमागचाच रस्ता होता. मात्र मी त्या रस्त्यावर जाऊन पाहिले तेव्हा आमची खोली दुसऱ्या. मजल्यावर दिसत होती. इथे सर्वसाधारणपणे सर्वच घरांचे बांधकाम असेच होते. अशा परिस्थितीत वाहतूक सुरळीत चालावी म्हणून जे अनेक उपाय सिक्कीम सरकारने योजलेले आहेत त्यात पुढील इशाऱ्याचाही समावेश आहे. इशारा: जो कुणी झरे आणि नाल्यांमधे केरकचरा आणि बांधकामातील मलबा इत्यादी टाकेल, त्यास रु.५,०००/- दंड किंवा सहा महिनेपर्यंतची कैद अथवा दोन्हीही होऊ शकेल. - हुकुमावरून. शहरी विकास आणि गृहनिर्माण खाते, सिक्कीम सरकार. असा सज्जड दम भरल्यावरही असले अपराध करणारे अजिबात नव्हतेच असे नाही.

---

फांदीवर बसलेल्या पाखराला फांदी तुटण्याची भीती नसते, कारण त्याचा त्या फांदीवर विश्वास नसून, आपल्या पंखांवर विश्वास असतो.




**उंच सखल भूमीवर वसलेले हॉटेल**

अशा डोंगर-उतारांवर वसलेल्या गान्तोक शहरात, मोठी सपाट अशी जाग मिळणे प्रायः दुरापास्त होते. तरीही ज्या काही मोजक्या जागी अशी प्रशस्त ठिकाणे सापडतात, त्या आहेत महात्मा गांधी मार्ग, पाल्जोर स्टेडियम आणि बुद्ध मठ. सुदैवाने या तिन्ही जागा व्यवस्थित पाहण्याची संधी आम्हाला मिळाली. आमच्या हॉटेलपासून पंधरा-वीस मिनिटांच्या पायी चालण्याच्या अंतरावर महात्मा गांधी मार्ग असल्याने तो वारंवार जाऊन नीट पाहता आला. पेव्हर ब्लॉकच्या साहाय्याने नीट बांधलेल्या महात्मा गांधी रस्त्यावर वाहनांना मनाई आहे. वर्षांतले केवळ काही दिवसच स्वच्छ सूर्यप्रकाशात नाहणाऱ्या गान्तोक शहरात, कोवळे पिवळे ऊन पडलेले असल्याने रस्त्याच्या दुभाजकानजीक ठायीठायी ठेवलेल्या बाकड्यांवर फुरसतचंद लोक मजेत बसून विहार करत असल्याचे (पक्षी, उन्हे खात असल्याचे) दिसून येत होते. मुख्यतः गरम कपड्यांची, प्रकाशचित्रण साहित्याची आणि पर्यटनविषयक दुकाने दिसत होती.

पाल्जोर स्टेडियम जवळच आमचे हॉटेल सिक्कीम रिट्रिट असल्याने प्रभातफेरी-सायंफेरीत ते चहुबाजूंनी पाहता आले. महात्मा गांधी मार्गाकडून पाल्जोर स्टेडियमकडे येणारा रस्ता पी.एस. रोड म्हणून ओळखला जातो. याच रस्त्यावर सिक्कीम सरकारची अनेक महत्त्वाची कार्यालये आहेत. अनेक हॉटेल्स आहेत. याच रस्त्यावरून पाल्जोर स्टेडियमचे अतिशय देखणे विहंगम दृश्य पाहता येते. रांका बुद्धमठाची जागाही अशीच प्रशस्त सपाट असल्याचे आढळून आले. इथेच आम्हाला लोण्याच्या दिव्यांची पुढील जाहिरात दिसून आली. लोण्याचे दिवे बुद्धाला, धर्माला आणि संघाला पारंपरिकरित्या अर्पण करण्यात येतात. जेव्हा आपण लोण्याचे दीप उजळतो तेव्हा आपण आपल्या कृतीचे श्रेय सगळ्याच संवेदनाक्षम जीवांच्या प्रबोधन आणि सौख्याकरता समर्पित करत असतो. प्रत्येक दिव्याची किंमत लहान=रु.५/-, मध्यम=रु.१०/-, मोठा=रु.१००/-. या सर्व लोण्याच्या दिव्यांच्या विक्रीतून मिळणारा पैसा मठाच्या इंधन आणि अन्नविषयक गरजांच्या पूर्ततेकरता वापरला जातो.

रांका बुद्धमठ अतिशय भव्य आहे. सोबत विस्तृत ओवऱ्याचे निवासी संकुलही आहे. मठाच्या मुख्य दालनात शेकडो विद्यार्थ्यांना उभ्या-आडव्या ओळींतून बसण्याची सुरेख आसनव्यवस्था आहे. दोन्ही बाजूस पुरुषभर उंचीचे आडवे ढोल ठेवलेले आहेत. बुद्धमूर्ती तसेच गुरू पद्मसंभव (गौतम बुद्धाचे परम शिष्य, ज्यांनी तिबेटमधे बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला.) म्हणजेच रिंपोचे यांची मूर्तीही सुवर्णवर्णी असून समोर दिवे उजळलेले असतात. अतिशय स्वच्छ, टापटीपीचे आणि पवित्र वातावरण इथे निर्माण केलेले आहे. मठाच्या आवारात अनेक फिरते दंडगोल भिंतीलगत लावलेले आहेत. पुण्यसंचयाकरता गुरू पद्मसंभव यांचे नामस्मरण करून ते फिरवावेत अशी प्रथा आहे. गुरू पद्मसंभव यांची एक गोष्टही दरम्यान माहीत झाली. ती अशी,- गुरू पद्मसंभव ल्हासा (तत्कालीन तिबेटची राजधानी) इथे जात असता उत्तर सिक्कीम जिल्ह्यातील तिस्ता नदीच्या मुळाशी एक सरोवर होते तिथवर पोहोचले. ते सरोवर त्या काळी वर्षाचे बाराही महिने कायमच गोठलेले असे. स्थानिक लोकांनी पद्मसंभव यांना आपली ही व्यथा सांगितली की, जवळच पाण्याचा इतका प्रचंड साठा असूनही पिण्याला पाणी मिळत नाही.

त्यावर पद्मसंभव यांनी सरोवरास चरणस्पर्श केला. आणि काय आश्चर्य! त्या सरोवराचे वितळून, पाण्यात रूपांतर झाले. त्यानंतर ते सरोवर कधीही, अगदी हिवाळ्यातही गोठेनासे झाले. त्या सरोवरास गुरू पद्मसंभव

---

संकटसमयी मूर्ख लोक ज्योतिषाकडे धावतात, तर शहाणे लोक आपल्या बुद्धिचातुर्याच्या व शक्तीच्या जोरावर संकटाशी सामना करतात. - पंडित जवाहरलाल नेहरू

यांचे नावावरूनच हल्ली 'गुरूडोंगमार' म्हणतात. नामची ही दक्षिण सिक्कीमची राजधानी आहे. भुतिया भाषेत नाम म्हणजे आकाश आणि ची म्हणजे उंच. म्हणून नामची म्हणजे 'उंच आकाश'. नामची येथे सिक्कीमचे तारणहार रिंपोचे, यांची ३६ मीटर (१२० फूट) उंचीची जगातील



सर्वात भव्य मूर्ती आहे. गुरूडोंगमार अथवा नामची या दोन्हीही ठिकाणी आम्ही गेलेलो नाही. मात्र, गुरू पद्मसंभव यांच्या उचित उल्लेखाविना सिक्कीम सहलीचे वर्णन पूर्ण होणार नाही.

सिक्कीम सरकारने निर्माण केलेला बनझांकरी (म्हणजे शुद्ध मराठीत 'वनाची झलक दाखवणारा') कृत्रिम धबधबा आणि सोबतचे सर्वच उद्यान सौर ऊर्जेवर संचालित आहे. इथे ऊर्जेच्या सर्वच स्वरूपांची, त्यांच्यातील परस्पर विनिमयांची आणि तत्संबंधी अनेक विषयांची माहिती, शालेय मुलांना नीट समजून घेता येईल अशा प्रात्यक्षिकांद्वारे व्यवस्थित उलगडून दाखवलेली आहे. मनोरंजक प्रयोगांद्वारे, खेळण्यांद्वारे विविध प्रकारच्या ऊर्जातरणांची माहिती उद्बोधक रीतीने उघडपणे मांडून दाखवलेली आहे.

उदाहरणार्थ चित्रातील घसरगुंडी पाहा. तिच्या घसरत्या भागावर एक फिरता पट्टा बसवलेला असून, तो पुढल्या भागाच्या तळाकडून पाठीमागे शिडीच्या सर्वोच्च



भागाखालून पुन्हा वर पोहोचतो. आपण घसरू लागलो की पट्टा फिरू लागतो. पट्टा बारकेसे ऊर्जानिर्मिती संयंत्र चालवतो. त्यात निर्माण होणारी विद्युत-ऊर्जा एक ध्वनीफीत चालवते, ज्यामुळे आपल्याला संगीत ऐकू येऊ लागते. दुसऱ्या चित्रातील आडव्या डब्यात पिवळ्या खांबांकडे तोंड करून त्या दोन खांबांच्यामधे डब्यात उभे राहायचे. मग पुढे चालत जाण्याचा प्रयत्न केला की सगळा डबाच घड्याळाच्या दिशेने गतीमान होतो. त्या चक्राकार गतीचाच उपयोग विद्युत-ऊर्जा निर्मितीकरता करून घेतलेला आहे.

त्या ऊर्जेवर मग संगीत ऐकू येऊ लागते. माणसाच्या उरातून निर्माण होणारे चैतन्य (ऊर+जा=ऊर्जा) प्रथम यांत्रिकी हालचालीत, मग विद्युत-ऊर्जेत आणि तत्पश्चात ध्वनीरूपात आपल्याला संगीत ऐकवू लागते तेव्हा आपल्या (मुलांच्या) ऊर्जाविषयक जाणीवा किती झपाट्याने समृद्ध होत जातात ते तिथे प्रत्यक्षच अनुभवायला मिळाले. म्हणून एरव्ही ते अविश्वसनीयच वाटले असते. इनक्रेडिबल इंडिया! त्यानंतर आम्ही गान्तोक रज्जूमार्गावरून शहराचे विहंगम दृश्य पाहण्याचा अनुभव घेतला. सोबतचे चित्र शहरातील रस्त्यांची रचना स्पष्टपणे दाखवत आहे.



जेवण झाल्यावर नामग्याल इंस्टिट्यूट ऑफ तिबेटोलॉजी आणि तिथला बुद्धमठ पाहण्यासाठी गेलो.

आपल्या मनातली भीती मृत्यूला थोपवू शकत नाही. मात्र ती आपले आजचे जगणे नक्कीच थोपवू शकते.

चीनने तिबेटवर कब्जा केल्यानंतर ल्हासामधून अगणित निर्वासित सिक्कीममधे आले. त्यांचे पुनर्वसन आणि तिबेटमधील कला व परंपरांच्या जोपासनेकरता या संस्थेची स्थापना झालेली आहे. इथे एक तिबेटी हस्तलिखितांचे भव्य ग्रंथालयही बघता आले.





तिथून मग आम्ही सिक्कीमच्या हस्तकला संग्रहालयात गेलो. इथे हातमागावर लोकरी वस्त्रे विणण्याचे तसेच लाकडावर कोरीव काम करण्याचे प्रशिक्षणही दिले जात होते. तेही पाहता आले. त्यानंतर आम्ही गणेशटोक या टेकडीवरील गणपतीस गेलो. सर्वात शेवटी गान्तोक पुष्पप्रदर्शनास गेलो. ऑर्किडच्या फुलांचे एवढे रम्य प्रदर्शन मी आजवर पाहिलेले नव्हते. मन प्रसन्न झाले. पुष्पप्रदर्शनाच्या दरम्यान आणखी एक आठवण जागी झाली ती म्हणजे हिरव्या निवडुंगी पर्णकमळांची. दार्जिलिंग ते कॉलिम्पाँग प्रवास झाल्यावर आम्ही एका निवडुंगाच्या बागेत गेलो. उत्तम-उत्तम निवडुंगांनी आणि त्यांच्या इवल्या-इवल्या नयनमनोहर फुलांनी मन प्रसन्न झाले. ही निवडुंगी पर्णकमले ऊन-सावलीच्या खेळात किती रम्य दिसत होती ते सांगून समजणे अवघडच आहे. नातू-ला च्या वाटेवर नागमोडी वळणांनी ४,००० फुटांचा चढ चढत आम्ही त्साम्गो तलावाजवळ येऊन पोहोचलो. त्साम्गो तलावाजवळचे सर्व वातावरणच भारलेले होते. कायम अभ्राच्छादित आकाशातून जरासा सूर्य डोकावला की, क्षणात निळ्या आकाशाची सावली तळ्यात पडून, पृष्ठभागावर चकचकीत निळसर आरसा प्रसन्नपणे चमकू लागे. तशातच डोंगराच्या दोन सोंडांच्यामधून आकाशातून उतरून, ढगच तलावात शिरू पाहात.

वातावरणात आर्द्रता इतकी भरून राहिलेली असे की, जरासे वारे सुटले तर शून्य अंश सेल्शिअसच्या आसपासच्या त्या तापमानात कापरे भरू लागे. आभाळ ढगाळले की लगेच थंडी दाटून येई. 'घडी में तोळा, घडी में मासा' अशा प्रकारचे क्षणोक्षणी रंग बदलणारे आकाश, क्षणोक्षणी संग बदलणारे वातावरण आणि कमालीच्या स्वच्छ, आरस्पानी पाण्यावर उमटणारी छाया-प्रकाशाची क्षणचित्रे या सगळ्यांमुळे त्या सरोवराचे सान्निध्य केवळ गूढरम्य बनून राहिले होते. तळ्यापारच्या डोंगरावरचे काळे बर्फ त्या डोंगरांवर नक्षी काढून पहुडलेले होते.

तिथून पुढे निघाल्यावर, लष्कराच्या शिबिराजवळ एके ठिकाणी 'मेरा भारत महान' आणि 'हमही जीतेंगे' या दोन देशभक्तीपर घोषणा रोमन लिपीत, काळ्या बर्फात कोरून ठेवलेल्या दिसल्या. काळा बर्फ म्हणजे काळ्या रंगाचा बर्फ नव्हे, तर नेहमीसारखा पांढराच. मात्र, वर्षानुवर्षे सतत साकळून राहिलेला असल्याने सहजी वितळत नाही, आणि प्रखर उन्हातही तळपत राहतो, तो बर्फ. नंतर एका कमानीपर्यंत आमच्या वाहनाने आम्हाला आणून सोडले. वाहन खाली वाहनतळावर रवाना झाले. गाडीतून उतरलो काय अन् अंगभर थंडी दाटून आली. सर्वात प्रथम भावना झाली ती एक नंबरची. गरजेची निकड पुरवणारी सुविधाही जवळच उपलब्ध करून ठेवलेली दिसली. जरा मोकळे झाल्यावर इतरत्र पाहण्याचे भान आले.

ही कमान म्हणजे नातू-ला नाही. ही आहे तिथपर्यंत पोहोचण्याच्या वाटेवरची सर्वात खालची कमान. समोरच्या कमानीपासून साधारणपणे अर्धा किलोमीटर अंतर पायऱ्या चढून वर जायचे होते. मगच आम्हाला परंपरागतपणे अव्याहत वापरात असलेल्या आंतरदेशीय पुरातन रेशीममार्गावरचे महाद्वार पाहायला मिळणार होते. चीनसोबतच्या आपल्या सीमेवरचे प्रवेशद्वार आम्ही पाहू शकणार होतो. आम्ही तर बूट, पायमोजे, जीन्स, शर्ट, जॅकेट, हातमोजे, कानटोपी इत्यादी नखशिखांत जामानिमा केलेला असूनही काकडत होतो. तापमान उणे चार अंश सेल्शस होते. सूर्य ढगांचे कवाड किलकिले करून पाहात

होता. त्याच्या त्या दृष्टिक्षेपाने हुरूप येऊन आम्ही कमानीतून अग्रसर झालो. उत्साहात चढत होतो. किती पायऱ्या झाल्या मोजल्या नाहीत. मात्र लवकरच आम्ही त्या टेकडीच्या वरच्या टोकावर उभे असल्याचे आमच्या लक्षात आले. समोरच्या बाजूला एक काटेरी तारेचे कुंपण होते.



पलीकडे लाल रंगाच्या पक्क्या इमारतीवरला लाल तारा, ती इमारत चिनी असल्याचे घोषित करत होता. अलीकडे पत्र्याच्या छताचे एक घरच आपला इमला होते. दोहोंच्या दरम्यान कुंपणाअलीकडे आम्ही उभे होतो. खिंडीवरच्या पाटीवर Nathu La Business Channel for China-India Border Trade असे लाल अक्षरांत लिहिलेले होते. आम्ही त्साम्गो सरोवरापासून नातू-ला पर्यंत आलो त्या मार्गावर सुमारे अर्ध्या रस्त्यातच शेरेथाँग ट्रेड मार्ट या नावाचे आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्राचे बांधकाम जोरात सुरू होते.

हल्ली नातू-ला स भेट देण्याकरता, बुधवार, गुरुवार, शनिवार व रविवार या चार दिवसांतच पर्यटकांना अनुमती देतात. तो दिवस, बुधवार दिनांक २४-०३-२०१०, रामनवमीचा दिवस होता. रामजन्माची -दुपारी बाराची- वेळ होती. आम्ही सगळ्यांनी मिळून 'भारत माता की जय, जयहिंद' अशा प्रकारच्या त्रिवार घोषणा केल्या आणि रामजन्म साजरा केला. नातू-ला म्हणजे 'ऐकत्या कानांची खिंड.' रेशीममार्गावरून देशोदेशींचे प्रवासी जात. आपापल्या देशांतील बित्तंबातम्यांची चर्चा ते खिंडीतून जातांना करत असावेत. त्या गप्पा खिंडीला ऐकू येत असाव्यात म्हणूनच स्थानिकांनी त्या खिंडीला 'ऐकत्या कानांची खिंड' किंवा 'नातू-ला' असे नाव दिले असावे असे वाटले.

अशा वातावरणात आमची सुमो मग परत त्साम्गो तळ्याच्या पाळीवर येऊन थांबली. लगेचच दोनचार याक व त्यांचे मालक अवतीभवती जमा झाले. आम्हालाही याक बघण्याची, त्यावर स्वार होण्याची, स्वार होऊन फोटो काढवून घेण्याची हौस होतीच. मात्र, ज्याच्या दर्शनानेही घाबरायला व्हावे, असल्या याकांवर, केवळ त्यांच्या मालकांच्या भरोशावर आम्ही खुशाल सवार होत होतो, हेच मला मोठे आश्चर्य वाटत होते. याक हा प्राणी दिसायला



जेवढा गबाळा वाटे तेवढाच असायलाही होता.नाक दाबूनच स्वार व्हावे लागत असल्याने, प्रत्येकाला उतरण्याची सुद्धा घाईच होती. तरीही, कुठल्याही याकाने बंडखोरी केली नाही. जराही अवखळपणा न करता आपापल्या मालकांना इमाने-इतबारे उपजीविका मिळवून दिली. सख्खी पोरेही मायबापांच्या इतक्या वचनांत असलेली मी पाहिलेली नाहीत. धन्य ते याक आणि धन्य ते त्यांचे मालक! कदाचित शीतकालीन हाल-अपेष्टांचा मुकाबला परस्पर सहकार्याने करताना याक व त्यांचे मालक परस्परांच्या गरजांना आणि सामर्थ्यांना जास्त चांगल्या प्रकारे समजावून घेऊ लागले असावेत.

यानंतर आम्ही एका पडावावर थांबलो. तिथे या वाटेवर वाहने चालवणाऱ्या सर्व वाहनांचे चालक राहतात असे एक गाव होते. चालक कठीण पर्वतीय प्रदेशात अवघड वातावरणात वाहने चालवून थकलेले असतात,

ते गावात येताच विश्रांती घेतात. प्रवाशांनाही सोबत आणलेले खाद्यपदार्थ आस्वादण्याइतका थकवा आलेला असतोच. शिवाय छोट्यामोठ्या दुकानांच्या ओळीच्या ओळी इथे स्वागतास सज्ज असतात. मोमो–म्हणजे तांबड्या भोपळ्यासारख्या दिसणाऱ्या स्क्वॅश नामक फळाची भाजी भरलेले उकडलेले वा तळलेले मोदक अथवा करंज्या, थुपका–म्हणजे नुडल्स, सूप्स–म्हणजे तऱ्हतऱ्हेची सारे; इत्यादी स्थानिक चवदार पदार्थांनी क्षुधाशांतीच्या साधनेस हुरूप आला. जंतर–मंतर (प्रसाधन–सुविधेस सचिन ट्रॅव्हल्सच्या सहलींमधे प्रचलित असलेले नाव) थांबाही मिळाला. असे म्हणतात क, निसर्ग मेहेरबान असेल तरच नातू–ला ची सहल निर्विघ्न पार पडू शकते. त्याचे प्रत्यंतर इथे पोहोचताच आम्हाला आले. अचानकच धो धो पाऊस पडू लागला. आम्हीही लगेच कल्पना करू लागलो की, हाच पाऊस जर नातू–ला वर असतांना पडला असता तर वाहनातून पाय–उतार होण्याचीही हिंमत आम्हाला झाली नसती.





सकाळी ९ वाजता नास्ता झाल्यावर, आम्ही तत्परतेने महात्मा गांधी मार्गावर एक प्रभातफेरी मारून आलो. केरकचरा आणि पानाच्या पिचकाऱ्या विरहित क्षेत्र (लिटर अँड स्पिट फ्री झोन), अशी पाटी दिमाखाने मिरवत महात्मा गांधीपथ आमचे सहर्ष स्वागत करत होता. खरेदीचा हुरूप काहीकेल्या मावळत नव्हता.

मग सुमारे दोन तासात जवळजवळ तीस किलोमीटरचे अंतर कापून आम्ही रँग्पो इथे पोहोचलो. आमच्यासोबतच्या जर्मन नागरिकांच्या 'ईनर लाईन परमिट'चे सोपस्कार सांभाळण्याकरता थोडे थांबलो आणि मग पुन्हा प्रवास सुरू झाला. तिस्ता नदीवरला सिक्कीम–पश्चिम बंगाल सीमेवरला पूल ओलांडला आणि मग आम्हाला लागले दार्जिलिंग–गोर्खा–हिल–कौन्सिलचे 'चित्रे वे–साईड इन्न रिव्हर राफ्टिंग सेंटर'. इथेच आम्ही जेवलो. दार्जिलिंगहून जेव्हा सिक्कीमला निघालो होतो तेव्हा इथेच, आकाश भरून आल्याने व पाऊस पडू लागल्याने, आमच्यातील बहुसंख्य लोकांनी तराफातरणाच्या कार्यक्रमास फाटा देण्यास प्राधान्य दिले. तेव्हा, वेळ असूनही आम्ही पावसाच्या भीतीने तराफातरण करू शकलो नव्हतो. आता तर रात्री आठची दार्जिलिंग मेल न्यू–जल–पैगुडीस जाऊन पकडायची असल्याने, गाठीस वेळच नव्हता. येनकेनप्रकारेण तराफातरणाची संधी हुकली होती. रँग्पो ते सिलीगुडी अंतर हा त्या मानाने सपाटीवरला प्रवास. या प्रवासात रस्त्याच्या दुतर्फा शाल्व (साल– ज्याच्या खोडाच्या लाकडाचा उपयोग लोहमार्गाखाली आधार देण्याकरता करतात, स्लीपर्स म्हणून) वृक्षांची लागवड दिसून आली. हिरवा गार लंबवर्तुळाकृती डौलदार पर्णविस्तार आणि काळसर बुंधा (खोड) यांनी नटलेली उंचच उंच झाडे सर्वदूर लावलेली होती. नजर पोहोचेस्तोवर चारही बाजूंना साल वृक्षच दिसत होते. पुढे साल लाकडाच्या भव्य वखारी आणि आगरेही नजरेस पडली. सालाचे कठीण लाकूड किंमती असते आणि त्याचे उत्पादनही ४,००० ते ६,००० फुटावरच्या निम्न–हिमालयन पठारांवरच होऊ शकते. त्यामुळे, रँग्पो ते सिलिगुडी प्रवासात सालाची कृत्रिम अरण्ये दृष्टीस पडणे हा केवळ योगायोगच नव्हता, तर या भौगोलिक कारणांमुळे तसे घडणारच होते. अखेरीस आम्ही न्यू जल पैगुडीस पोहोचलो आणि यथावकाश मुंबईस परत आलो. मात्र लक्षात राहिले ते चिरतरुण सिक्कीमचे झळाळते निसर्गसौंदर्य.

**संदर्भः** सिक्कीमची सहल : http://nvgole.blogspot.in/2010/04/blog-post_25.html#links

**– नरेंद्र गोळे**
१०४, दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# नर्मदा परिक्रमा
भाग : २२

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत – संपादक*

**दिवस ६१ वा. नेमावर ते छिपानेर,**
**मुक्काम : त्यागी आश्रम**

काल रात्रीचा मुक्काम नेमावर येथील ब्रह्मचारी आश्रमात होता. आश्रमाचे प्रमुख संत गाडगीळ सध्या इस्पितळात दाखल आहेत. आश्रम अत्यंत स्वच्छ आहे. सेवेकरी नम्र आणि तत्पर आहेत. अत्यंत अगत्यशीलता अनुभवास आली. पुन्हा पुन्हा यावेसे वाटावे असा हा आश्रम आहे.

समोर नदीकाठी असलेल्या सिद्धेश्वर मंदिराचे गोपुर खूप उंच आहे, परंतु हा आश्रमही उंच टेकडीवर असल्यामुळे गोपुर नजरेच्या पातळीत येते.

सिद्धेश्वर महादेव मंदिर म्हणजे शिल्पकलेचा स्वर्गीय आविष्कार आहे. हे मंदिर एकाच राजवटीत झालेले दिसत नाही. आधीचे व नंतरचे असा सौंदर्यभेदही बांधकाम आणि शिल्प कलाकृतींमध्ये जाणवतो. या मंदिराचे बरेच फोटो मी काढले आहेत.

सकाळी आश्रम सोडताना मंदिरात नित्याच्या प्रार्थनेसोबत महामृत्युंजय मंत्रही म्हटला. गाडगीळ महाराजांना लवकर बरे वाटावे म्हणून देवाकडेही आमची मंत्रमय मागणी होती.

आश्रम सोडला. समोरच मैय्या आहे. परंतु गावाबाहेर पडून नंतर मैय्याकिनारी उतरलो. थोड्याच वेळात एका उपनदीने वाट अडवली. पात्र खोल होते. एका केवटाने (नावाडी) चार-चार जणांचा गट असे आम्हाला पलीकडल्या तीरावर सोडले. डोंगी नावाचा नावेचा एक प्रकार इतका अरूंद असतो की त्याची रुंदी फारतर आपल्या खुर्ची एवढीच असते. पाठीवरची सॅक पाठीवरच ठेवावी लागते. जरा इकडे तिकडे झाले तर डोंगी पाण्यात सरळ उपडी होते.



केवटाने आम्हाला नदीपार केले ती ही उपनदी नंतर थोड्या अंतरावर मैय्याला मिळते. याचा अर्थ आम्ही संगमाजवळच उपनदी पार केली होती.

मैय्याकिनारी चालणे तसे सोपे नसते. पाऊल रुतेल अशी मऊ रेती, चिखल, काटे, पात्रामध्ये ट्रॅक्टरमुळे झालेल्या खोल खोल चाकोऱ्या. अशा या अरूंद आणि खोल चाकोऱ्यामधून सांभाळून चालणे फार त्रासदायक होते.

तासभर चालल्यानंतर पुन्हा एक नदी आडवी आली. पूर्वी पार केलेली नदी दहा-बारा फुटाहून खोल होती आणि म्हणून ती पार करायला नाव लागली आणि आश्चर्य म्हणजे नावाड्याने आम्हाला नदीपार केले ते केवळ सेवाभाव म्हणून! आम्ही मात्र कृतज्ञता म्हणून त्याला काही पैसे बळेबळेच दिले.

'सर्वेत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्।।

हा मंत्र म्हणून त्या नावाड्याला मंत्राचा अर्थ समजावून सांगितला व त्याच्या या सेवा कार्याला मैय्याचे आशीर्वाद नित्य राहोत सांगून पुढे निघालो होतो.

आताची उपनदी दोन-तीन फुटाहून खोल नव्हती. मैय्याला मिळणारा तो एक पसरट व उथळ प्रवाह होता. प्रवाह ओलांडायचा म्हणजे बूट काढावे लागतात. त्यासाठी बसायला उंच आणि कोरडी जागा लागते. बूट व्यवस्थित सॅकला बांधावे लागतात आणि लुंगी भिजू न देता प्रवाह ओलांडला की बूट घालण्यासाठी पुन्हा हेच सव्यापसव्य करावे लागते.

प्लास्टिक चपला किंवा सॅण्डल प्लॅस्टिकचे असले तर काढावे लागत नाहीत. अनवाणी असणारे तर या बाबतीत फारच भाग्यवान!

दिवसातून तीन-चार नद्या पार कराव्या लागतात. नर्मदा नदीला ९९९ उपनद्या येऊन मिळातात. पूर्वी तर प्रत्येक नदी पायीच ओलांडावी लागे. प्रसंगी छातीभर पाण्यातूनसुद्धा! नावेची सोय खोल पात्रांसाठी ! तेही नाव व केवट उपलब्ध असेल तर; नाहीतर वाट पाहात थांबणे.

हल्ली काही प्रवाहांवर साकव किंवा छोटे मोठे पूल झालेले आहेत. त्यामुळे त्रास थोडा कमी झाला आहे.

प्रवाह दोन-तीन फूट खोल आणि दहा-पंधरा फूट रुंद होता. मी बूट काढायचा कंटाळा केला आणि बुटासकट पाण्यात शिरलो. नंतर फार वेळ चुळूक बुळूक सुरू होते. पश्चाताप झाला.

नदीकिनारी काही वेळाने वाट बंद झाली तेव्हा चढून गावात आलो व नदी समांतर कच्चा रस्ता धरला. मैय्याचे पात्र रुंद असले तरी उथळ असावे असे वाटते. जागोजागी घातलेल्या बांधांमुळे हे असे झाले असावे.

नदीप्रवाहाला समांतर रस्ता, त्या पलीकडे डाव्या हाताला शेती. गहू आणि हरबरा पीक दिसते. टणटणी फुलांचे रंगवैविध्याने होणारे अनेक प्रकार गेले काही दिवस पाहतोय. गणेश वेलाची लालचुटुक फुले दोन-तीन ठिकाणी पुन्हा दिसली. झेंडूने बहरलेली रोपे फारच मनमोहक आहेत.

नदीकिनारी असणाऱ्या गावांना प्रायः एकच कच्चा रस्ता जोडत जातो. गावे दूर दूर अंतरावर असली तरी गाव जवळ आल्याची ओळख देतो तो हगिरडा! गावाच्या अलीकडे आणि नंतर पलीकडे अर्धा-एक किलोमीटर रस्ता दुर्गंधीने भरलेला असतो. या भागातून चालणे म्हणजे फार मोठी शिक्षाच असते.

चिंचेचे महावृक्ष लक्ष वेधून घेतात. हे वृक्ष उंचीने वड पिंपळांशी टक्कर घेत नसले तरी त्यांचा रुंद पिळदार प्रचंड बुंधा त्यांचे पुरातनत्व सांगत असतो. रस्त्यावरील मातीचा पोत पिवळसर आहे. बोरीची झाडे फार उंच नाहीत परंतु दागिन्यांनी मढलेली, विशेषतः मौक्तिक माळांनी नखशिखान्त सजलेली सौंदर्यवती असावी तशी ती झाडे हारीने लागलेल्या आणि पिकायला लागलेल्या टपोऱ्या बोरांनी लगडलेली आहेत. खाली बोरांचा खच पडलेला असतो. जमिनीपर्यंत अगदी हाताला लागतील अशी बोरे पाहिली की ती खाण्याचा मोह मी टाळत नाही.

बऱ्याच ठिकाणी लेकुरवाळ्या बोरी कापून टाकलेल्या दिसल्या. बाभळी आणि बोरी तोडून कुंपण म्हणून शेतीभोवती लावतात.

वाटेत दोन ठिकाणी आग्रहाने चहा दिला गेला. पैकी पंवार नावाचा मुलगा स्वाध्यायी आहे; या चिचली गावात नियमित स्वाध्याय चालतो.

वाटेत खूप प्रकारचे पक्षी दिसत आहेत. माझ्यासाठी नवीन आहेत. खारी मुक्त बागडतायत् पाहून फार आनंद होतो. कारण शहरांमधून खारी आता लुप्तच झाल्या आहेत. साळुंक्या तर प्रत्येक ठिकाणी आढळतात आणि आता, गेले काही दिवस पोपटही भरपूर प्रमाणात दिसायला लागले आहेत.

---

कुणीही चोरू शकत नाही अशी संपत्ती कमावण्याचा प्रयत्न करा.

नदीच्या पात्रात एखादे सुंदर बेट किनाऱ्याजवळ दिसते, ज्यावर पाणपक्षी हक्काने जाऊन बसतात. एकाददुसरे वाळलेले काष्ठ त्यावर उभे असते आणि पाण्यात पडलेले एकूण प्रतिबिंब पाहून मला फोटो घेतल्यावाचून राहवले नाही.

डाव्या हाताला शेतीची विस्तीर्ण हिरवाई दिसते. या हिरवाईत शुभ्र पांढऱ्या फुलांचा पंधरा-वीस फूट रुंदीचा पट्टा आत अगदी खोलवर गेलेला पाहिला आणि परिराज्यात वावरतोय असे वाटू लागले. ही शुभ्र रुंद नक्षी बऱ्याच ठिकाणी मन मोहून घेत होती.



'नर्मदे ऽ हर' हा घोष तर सतत सुरू आहे. मोठ्यांपेक्षा लहान मुले या बाबतीत आघाडीवर असतात. मुले लांबून धावत येतात. हात जोडतात आणि 'बाबाजी, नर्मदे हर' असा पुकारा करीत अभिवादन करतात.

परिक्रमावासीयांना अभिवादन करताना काही विभागात ''नर्मदे हर गुरुजी''; तर काही ठिकाणी 'नर्मदे हर, बाबाजी' असे म्हणतात. मला या गोष्टीची गंमत वाटली.

खरोखर 'नर्मदे हर' हा एक अती प्रभावी अमर असा संजीवन संस्कार एकूण मैय्या क्षेत्रात आहे.

परवा झालेल्या पावसाने माती घट्ट झाली आहे. चालणे सुकर झाले आहे; परंतु पावसाळ्यात कार रबरबाट होत असेल त्याची कल्पनाच बरी!

दिवसभरात भोजनाचा योग आला नाही. संध्याकाळी छिपानेर येथील 'त्यागी आश्रम' गाठला. हा आश्रम नदीकिनारी उंचावर आहे. आश्रमासमोरचे मैदान चांगलेच उबडखाबड आहे. हे मैदान उतरत उतरत आपल्याला मैय्याकिनारी नेते. मैय्याला या क्षेत्रात 'भीम-ताल' असे नाव आहे. हा स्वतंत्र तलाव आहे असे नावावरून वाटते. परंतु नदी प्रवाहच वाटला.

वर मैदानात हनुमंताची भव्य, उभी मूर्ती आहे. आश्रम दोन खोल्यांचा. एक खोली म्हणजे देवघर तर दुसरी खोली म्हणजे बाबांचे निवासस्थान. या खोल्यांच्या मागच्या बाजूला जाळीचे उतरते छप्पर लावून परिक्रमावासियांची मुक्कामाची सोय केलेली आहे.

आश्रमाच्या नदीकडील फाटकातून मैय्यावर जाऊन मी स्नान, कपडे आटोपले. प्रत्यक्षात हे काम एकाच फेरीत आटोपायला हवे होते. परंतु तीन-चार वेळा जाऊन मी हा धुण्याचा कार्यक्रम पार पाडला.

अंधार केव्हाच झाला होता. भोजनाची तयारी सुरू होती. एकूण नऊ जण मुक्कामी होते. अशोकने भाजी चिरण्याचे काम अंगावर घेतले होते. बाबाने सदावर्त म्हणजे मुगाची डाळ व तांदूळ दिले. मला डाळीचे प्रमाण कमी वाटल्याने मी दुप्पट डाळ मागितली. मिळाली नाही. बाबा म्हणाले, 'पुरून उरेल.'

चूल पेटविली. पाणी उकळत ठेवले आणि स्वतः बाबांनीच पुढाकार घेऊन खिचडी शिजवली. खरोखरच अन्न पुरून उरले!

(डायरी लिहिताना समोर निळ्याभोर आकाशात मनोहारी चंद्रबिंब दिसत आहे. थंडी कमी आहे.)

**दिवस ६२ वा. छिपानेर-रानीपुरा-चौरसाखेडी, सातदेव-टिगाली-शीलकंठ-मण्डी नीलकण्ठेश्वर. मुक्काम : नीलकण्ठेश्वर धर्मशाळा (मौनी बाबा)**

सकाळी भरपूर थंडी होती. रात्री मला लघुशंकेनिमित्त

तीन-चार वेळा उठायला लागले होते. पहाटे पाच वाजता बहिर्दिशेनिमित्त बाहेर पडलो तेव्हा अतिशय थंड वारा होता. इतका गारठलो की आतमध्ये परतलो तर पंधरा मिनिटे गारठा कमी झाला नव्हता. हाडांत शिरणारी थंडी!

काल रात्रभर बूट बाहेरच ठेवले होते वाळण्यासाठी! पाण्यात भिजल्यामुळे बूट दिवसभर ओलेच होते. कोरड्या हवेमुळे ते वाळतील या अपेक्षेने मोकळ्यावर ठेवले होते. आता निघताना पाहिले तर ते ओले होते की गार पडले होते काही कळले नाही. धुतलेले कपडेही मैदानातील तारेवर वाळत घातले होते. त्यांचीही अवस्था तीच होती.

दुपारी जेवायला थांबतो तिथे स्नान कपडे आटोपले तर जेवण होईपर्यंत कपडे खडखडीत वाळतात. परंतु सकाळी निघण्यापूर्वी स्नान केले तर ओले कपडे बरोबर वागवायला लागतात. रात्री धुतले तर अशी अवस्था होते!

सकाळी निघालो तेव्हा थंडी असली तरी वारा थांबल्याने पहाटेच्या तुलनेने सुसह्य वाटत होती. रस्ता गावागावातून जाणारा परंतु उजवीकडे मैय्याचे अस्तित्त्व दर्शविणारा होता.

आज २६ जानेवारी म्हणजे आपला प्रजासत्ताक दिन. शाळेतील मुलांची भव्य शोभायात्रा चौरसाखेडी गावातून फिरत फिरत शाळेकडे निघाली होती. मला हे दृश्य टिपायचे होते. परंतु अती थंडीमुळे माझा कॅमेरा सकाळी कामच करत नव्हता. प्रयत्नकरूनही मी फोटो घेऊ शकलो नाही.

दरम्यान अशोक व मंगल पुढे निघून गेले. 'जय जवान जय किसान, पंडित जवाहरलाल नेहरू झिंदाबाद, महात्मा गांधी झिंदाबाद, लालबहादूर शास्त्री झिंदाबाद, भारत माता की जय!' अशा घोषणांनी परिसर भारला गेला. पहिलीपासून हायस्कूलपर्यंतचे सगळे विद्यार्थी त्यात जल्लोशाने सामील होते.

मीही त्या शोभायात्रेत सामील होऊन 'जय जवान-जय किसान'सह सर्व घोषणांना मोठ्याने प्रतिसाद देत त्यांच्यातलाच एक होऊन शाळेकडे निघालो. लहान मुले आश्चर्याने माझ्याकडे पाहात होती. लुंगीधारी दाढीवाला बाबाजी आपल्या मिरवणुकीत पाहून त्यांना काही वेगळेच वाटत असावे.

गाव फिरून यथावकाश शोभायात्रा ध्वज-वंदनासाठी शाळेत पोहोचली. मी, अशोक, मंगल आम्हा तिघांनाही स्वागतासह खास अतिथी म्हणून खुर्च्यांवर बसविले. हार व पुष्पगुच्छही दिले. ध्वजारोहणाचा कार्यक्रम रीतसर झाल्यावर दोन शब्द बोलण्याची विनंती आम्हाला करण्यात आली. परंतु आम्ही नम्रपणे नकार देऊन प्रसादाची बुंदी घेऊन पुढे रवाना झालो.

शोभायात्रेत सामील होण्यापूर्वी मला आग्रहाचा चहा मात्र गावात मिळाला होता.

शीलकण्ठ गावाकडे जाताना हळूहळू भोजनाची वेळ होऊ लागली. आपण शीलकण्ठ गावात विचारू असे मी अशोकला म्हटले. त्यावर तो म्हणाला की भोजनाची व्यवस्था झाली आहे.

गाव येण्यापूर्वीच हा निरोप अशोकला कसा मिळाला याचे गौडबंगाल मला उकलेना. चालताना आम्ही मागे-पुढे होत असतो. गामच्या टिगरी गावात कुणी साधुबाबा त्याला भेटले होते आणि शीलकण्ठ गावात भोजन मिळेल असे बाबांनी अशोकला सांगितले होते. त्या गावात साधुमहाराजांनी कुणाला तरी फोन केला म्हणे!

आता एक नवा पेच माझ्यासमोर उभा राहिला. गावात शिरल्यावर ते तथाकथित घर शोधावे कसे? परंतु गावात शिरलो आणि एका व्यक्तीने हात जोडून आमचे स्वागत केले आणि एका सधन घरामध्ये आम्हाला नेऊन सोडले.

घर म्हणजे गढीच होती. धान्याने भरलेला ट्रक, ट्रेलर

सहज शिरेल असे भव्य प्रवेशद्वार! प्रवेशद्वाराला लागून आतमध्ये दोन विस्तीर्ण देवड्या. आणखी आत मोकळी अंगणवजा जागा, बाजूला राहण्याच्या खोल्या.

यजमानांनी स्वागत केले. पाण्याची मोटर चालू होती. अनुज्ञा घेऊन आम्ही स्नान आटोपले. कपडे वाळत घातले. आम्ही आलो तेव्हा एक साधू उन्नप्रसाद ग्रहण करीत होता. त्याच प्रशस्त देवडीमध्ये आमची भोजन प्रसादाची व्यवस्था केलेली होती.

वांग्याचे भरीत, पालकाची पातळ भाजी, तांदळाची खीर, लोणचे, मुळ्याचे काप आणि गरमागरम पोळ्या एकामागून एक अशा थेट तव्यावरून आमच्या पानामध्ये येत होत्या. अंगणातील चुलीवर प्रत्यक्ष गृहलक्ष्मी अन्नपूर्णा स्वरुपात हा स्वयंपाक करून आम्हाला पुरवित होती.

मी दोनच्या ऐवजी चार पोळ्या खाल्ल्या. वर आग्रहाची अर्धी पोळी खावी लागली. सोबत गुळाचा खडा होताच.

अशा प्रकारे रामनारायण पंवार या माझ्याच वयाच्या भल्या गृहस्थांकडे आम्हाला राष्ट्रीय सणाचे अत्युकृष्ट भोजन मैय्याच्या कृपेने प्राप्त झाले.



रामनारायण यांच्या अंगणात छोटे शिवमंदिर आहे. सुबकपिण्डी, फणिनाग, वर तांब्याचे अती लखलखीत असे अभिषेक पात्र. दर्शनाने फार प्रसन्न वाटले.

सिहोरचा गहू मुंबईत, महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. आम्हीही घरी एम. पी. सिहोर-लोकवन हा गहू वापरतो हे सांगितल्यावर पंवारांना खूपच अभिमान वाटला. आपल्या जिल्ह्यातला गहू इतक्या दूरही प्रसिद्ध आहे हे ऐकून त्यांचा ऊर भरून आला.

ते स्वतः गहू पिकवतात. त्यांच्या घरी वापरण्यासाठी पिकवलेला गहू आणि बाजारात विक्रीसाठी जाणारा गहू या दोन्ही प्रकारचा गहू त्यांनी आम्हाला दाखविला. अर्थात घरी वापरण्यासाठी पिकविलेला गहू इतका सुंदर, टपोरा, तेजस्वी होता की आयुष्यात मी प्रथमच असा गव्हाचा दाणा पाहात होतो.

राहण्याचा प्रेमळ आग्रह होताच परंतु पुढे जायचे होते. किमानपक्षी मैय्याकिनारी असलेले मकराना संगमरवराची मूर्ती असलेले नर्मदामाता मंदिर तरी पहाच पहा हा पवारांचा आग्रह मोडता आला नाही. चालत जावे तर वेळ मोडेल म्हणून त्यांच्या मुलाने गाडीने पटकन आम्हाला तेथे नेऊन आणले. मंदिर सुंदर आहे. मंदिराबाहेरच्या मंडपात परिक्रमावासी भोजन तयार करण्यात गुंतले होते.



मंदिराचा पुजारी म्हणजे ज्या व्यक्तीने गावाच्या वेशीवर आमचे स्वागत केले होते तीच ही व्यक्ती होती.

आम्ही परतलो तेव्हा बाबाजी आलेले होते व गृहलक्ष्मी त्यांना अंगणात भोजन वाढत होती. जे बाबाजी

अशोकला टिगरी गावात भेटले होते आणि फोनवर ज्यांनी आमची अन्नप्रसादाची व्यवस्था केली होती; तेच हे बाबाजी होते.



गोरेपान, तरतरीत नाकाचे, भव्य, पण चेहऱ्याचा प्रेमळपणा न लपविणारी पांढरी शुभ्र दाढी. काषाय वस्त्र म्हणजे भगवी कफनी परिधान केलेले हे कृश शरीरयष्टीचे बाबाजी मूळचे पंजाबमधले आहेत. गृहलक्ष्मी समजत होतो ती पंवारांची मोठी सून होती. आणि याच बाबांकडून तिने गुरुमंत्र घेतला आहे. जे मंदिर आम्ही आताच पाहून आलो ते याच बाबाजींमुळे आकाराला आले आहे.

सातगांव येण्यापूर्वी एक उपनदी होडीच्या सहाय्याने ओलांडली. मण्डी गाव सोडून मैय्याकिनारा गाठला आणि पुन्हा एकदा एक उपनदी ओलांडली. परंतु फार खोल नसल्याने अनवाणी! काल बुटासकट पाण्यात गेल्याने संध्याकाळपर्यंत बूट ओले होते. ते स्वच्छ करणे हा तापदायक प्रकार झाला होता. म्हणून यापुढे बूट ओले होऊ देणार नाही.

वाटचाल मैय्या किनाऱ्याने, छान पायवाट, अवघड नाही. साडे-चार वाजता नीलकण्ठेश्वर गाठले. घाट चढून गावात शिरलो. नीलकण्ठेश्वर मंदिर आणि एक धर्मशाळा समोरच होती. पुढील गाव जवळच तीन किलोमीटर अंतरावर आहे ते मुक्कामासाठी गाठावे म्हणून गावाबाहेर पडून एक आडरस्ता धरला.

वाटेत एक-दोन जण भेटले व त्यांनी सांगितले की मुक्कामासाठी योग्य गाव सहा ते सात किलोमीटर दूर आहे. छितगाव ! छितगावापूर्वी एक गाव वाटेत आहे परंतु ते मुस्लिम गाव आहे. याचा अर्थ नीलकण्ठेश्वरात मुक्काम करणे प्राप्त होते.

नीलकण्ठेश्वराच्या धर्मशाळेत मुक्कामासाठी एक खोली बाबाजीनी उपलब्ध करून दिली. एव्हाना अंधार झाला होता. गावात वीज नाही. काही घरांनी इकडून तिकडून वीज वाहून आणली आहे. भोजनासाठी सदावर्त मिळत होते. परंतु चूल पेटवायची तर लाकडे नव्हती. जंगल नसल्याने लाकडे मिळण्याचीही शक्यता नव्हती. त्यातून चूलसुद्धा नीट पेटवता येत नाही म्हटल्यावर महाराज म्हणाले, ''चूल्हा जलाने नही आता तो परिक्रमा छोडके वापस घर जाएँ।''

बाजूला एक छोटेसे हॉटेल दिसले; त्याला विनंती केली तर खिचडी करून देण्यास त्याने स्पष्ट नकार दिला. मघाशी आम्ही छितगावाकडे जात असताना एकाने तेव्हांच आम्हाला सांगितले होते की इथेच मुक्काम करा, धर्मशाळा आहे सोय होईल.

ज्या झोपडीमधून आम्हाला ही माहिती मिळाली होती तिकडे आम्ही अखेर आमचा मोर्चा वळविला. खिचडी करून मिळेल का अशी विचारणा केली. ज्याला विचारले तो तीस एक वर्षांचा तरुण होता. प्यायलेला होता.

झोपडीच्या बाहेर वर झाडपाला टाकून केलेला उघडा मांडव होता. मांडवामध्ये एक बाज टाकलेली होती. बाजूलाच जळती लाकडे होती. हीच असावी चूल. कारण त्या तरुणाचे उग्र दिसणारे वडील चुलीवर चहा करीत होते. एकंदर संसार, व्यवहार अंगणातच चालत असावा असे जाणवले.

तो तरुण उत्तरादाखल उलट विचारता झाला की त्याच्याकडची खिचडी चालेल का? कारण तो जातीने भंगी आहे हे त्याने स्वतःच्या मुखाने आम्हाला सांगितले.

मी त्याला दैवी भ्रातृत्वाचे नाते समजावले. रक्त बनविणारी शक्ती एकच आहे. आपल्या सगळ्यांना उठविणारी, चालविणारी, अन्न पचविणारी आणि झोपविणारी शक्ती एकच आहे. आपले रक्ताचे नाते नसले तरी रक्त बनविणाऱ्याचे नाते आहे म्हणून आपण भाऊ भाऊ आहोत.

हे ऐकून तो फार आनंदित झाला. परंतु त्याचे वडील मात्र चिडचिड करीत होते. मुलावर डाफरत होते. धनगरी मिशांमुळे त्यांचा चेहरा अधिकच उग्र वाटायला लागला.

वडिलांना हे खिचडी प्रकरण पसंत नसावे असे वाटून मी त्यांना स्पष्टच विचारले की त्यांचा काही आक्षेप आहे का! त्यांना राग आला होता तो त्यांच्या प्यायलेल्या मुलाचा. हा सारा प्रकार काही गावकरी पाहात होते. धर्मशाळा, मंदिर, हे झोपडे, ते हॉटेल सारे काही एकाच वर्तुळात होते.

आम्ही धर्मशाळेत परतलो. मेणबत्ती लावून उजेडाची व्यवस्था केली. बाजूच्या हातपंपावर कपडे, स्नान आटोपले. थोड्यावेळाने आम्हाला खिचडी देऊ करणारा आणि त्याच्याबरोबर आणखी एक व्यक्ती आली. ''भोजनाची काय सोय केली आहे?'' अशी विचारणा केली तेव्हां आम्ही त्याला सांगितले की तुम्ही ज्याच्या बरोबर आहात त्याने खिचडी करून द्यायचे मान्य केले आहे.

ते दोघेही बाहेरूनच निघून गेले आणि हा सर्व प्रकार मंदिरातून पाहणारे आणि आम्हाला सुनावणारे की चूल पेटवता येत नसेल तर परिक्रमा सोडून घरी बसा, ते आले आणि आम्हाला विचारले की भोजनाची आम्ही काय व्यवस्था केली आहे.

आता आलेल्या माणसाने खिचडी द्यायचे कबूल केले आहे हे आमचे उत्तर ऐकून महाराज म्हणाले, 'मी तुमचे सर्व बोलणे ऐकले आहे, तो आलेला माणूस स्वीपर आहे. तुम्ही मला का नाही विचारले खिचडी देण्याबद्दल?'

मी म्हटले, 'महाराज जशी तुम्ही परिक्रमावासियाची जात विचारत नाही, तसेच आम्हीही भोजन देणाऱ्याची, आश्रय देणाऱ्याची जात विचारत नाही.'

महाराज म्हणाले, 'तुम्ही कुठे इतरत्र उतरला असता तर ते ठीक होते. परंतु तुम्ही माझ्या मंदिराच्या धर्मशाळेत उतरला आहात आणि भोजनाची सोय बाहेर करून घेतली तर माझी गावात बदनामी होईल.'

खरे म्हणजे महाराजांनी आम्हाला स्पष्ट सांगितले होते की, वृद्धापकाळामुळे ते खिचडी करून देऊ शकणार नाहीत आणि आमचे जेवण आम्ही चुलीवर शिजवावे आणि चूल पूटवता येत नाही तर घरी बसावे.

मी म्हटले, 'महाराज यात तुमची बदनामी होण्याचा प्रश्न येत नाही. कारण आम्ही हॉटेलवाला आणि आता हा भंगी या दोघांनाही सांगितले होते की महाराज आम्हाला सदावर्त देत आहेत. परंतु आम्हाला चूल पेटवता येत नाही म्हणून आपणाकडे खिचडी शिजवून देण्याची विनंती करीत आहोत.'

हे ऐकून महाराज नाराज मुद्रेने निघून गेले. धर्मशाळेसमोरील हातपंपावर अशोक कपडे धुवत होता आणि मंगल त्याला मदत करीत होती. मंगलला जेवायचे नव्हते.

थोड्या वेळाने महाराज हातात दोन ताटल्या घेऊन हजर झाले. 'दो मूर्ती खाना खाएगी ना?' असे म्हणून दोन्ही ताटल्या माझ्या सुपूर्द केल्या. त्यात गरम गरम थोडी थोडी खिचडी, वर तूप आणि सोबत गुळाचा खडा होता.

ती खिचडी खाऊन होते तोपर्यंत आम्ही सांगितलेली खिचडी आली. पॉलिथिनच्या दोन पिशव्यांमधून, भरपूर प्रमाणात !

आम्ही अगोदरच कल्पना दिली होती की मूठभर धान्याची खिचडी एकासाठी या हिशेबाने फक्त दोन मुठींची

(पृष्ठ क्र. २१ वर)

---

जर तुम्हाला आयुष्यामध्ये खूप संघर्ष करावा लागत असेल, तर स्वतःला खूप नशीबवान समजा,
कारण देव संघर्ष करायची संधी फक्त त्यांनाच देतो ज्यांच्यामध्ये क्षमता असते...!

# निगराणी ...

*सुसंस्कृत सुशिक्षित नागरिक घडण्यासाठी चांगले संस्कार, चांगल्या सवयी व संवाद याचे महत्त्व विशद करणारा लेख – संपादक*

बीज अंकुरे अंकुरे ओल्या मातीच्या कुशीत
असे रुजावे बियाणे माळरानी खडकात
बीजा हवी निगराणी, हवी मायेची पाखर

हे शीर्षक गीत आहे 'गोट्या' ह्या दूरचित्रवाहिनी वरच्या धारावाहिकेचे. किती सत्य ह्यात दडलं आहे! आपलंही जीवनचक्र या एका बीजाप्रमाणेच असतं, जसं बी मातीत पेरल्यावर त्याची योग्य काळजी घेतल्यावर काही कालावधीनंतर त्याचं सुंदर झाडात रूपांतर होतं आणि ते झाड दुसऱ्यांची काळजी घेतं. तसंच मुलांचं आहे. चांगले संस्कार, चांगल्या सवयी, त्यांच्याशी संवाद साधण ह्याचं खतपाणी आपण लहानपणापासून देत गेलो तर ही मुलं मोठेपणी सुसंस्कृत सुशिक्षित नागरिक होतील. आपल्या मुलांना गरज आहे ती आई–बाबांच्या मार्गदर्शनाची, प्रेमाची, वात्सल्याची, संवादाची आणि वेळेची.

आजचे आई–बाबा ह्यांचं जीवन घड्याळाच्या काट्यावर चालतं. त्यांना आपल्या मुलांसाठी वेळच मिळत नाही. ते करिअरच्या रेसमध्ये रोजच्या जमा–खर्चाची हातमिळवणी करण्यात इतके हरवून गेले आहेत की; आपली मुलं कशी मोठी होत आहेत, काय करत आहेत, कोणते विचार, संस्कार त्यांच्या मनावर बिंबवले जात आहेत ह्याची त्यांना काहीही कल्पना नसते. आजची परिस्थिती अशी आहे की मुलांना बाबांचं दर्शन फक्त सुट्टीच्या दिवशी होतं; तर काही काही मुलांचा बाबांशी संवाद फक्त दूरध्वनिवरून नाहीतर स्काईपवरून! आईची परिस्थिती काही वेगळी नाही आहे. तिला तर घर, नोकरी, मुलं सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागते. मुलांशी हितगूज करायला तर वेळच मिळत नाही. मुलं पाळणा घरात मोठी होत असतात आणि आई–बाबा त्यांना चांगले राहणीमान देण्यासाठी, उच्च शिक्षणासाठी पैशाची तरतूद करण्यात मग्न असतात. ज्यांच्यासाठी आपण रात्रीचा दिवस करीत आहोत ती मुलं कशी घडत आहेत ह्याकडे त्यांचं अजाणतेपणी दुर्लक्ष होतं.

मुलांना त्यांच्या वाढत्या वयात खरी गरज असते ती आई–वडिलांच्या प्रेमाची, सहवासाची, संवादाची. त्यांना आपल्या आई–बाबांबरोबर खूप बोलायचं असतं, अनुभव शेअर करायचे असतात, त्यांच्या निरागस मनात खूप प्रश्न असतात, त्याची उत्तर त्यांना हवी असतात. परंतु आजच्या धकाधकीच्या जीवनात जेव्हा मुलांना बोलायचं असतं तेव्हा आई–वडील कामाचं कारण पुढं करून नंतर बोलू असं सांगतात. त्यांच्याबरोबर खेळण्याऐवजी दूरचित्रवाणी, मोबाइलवरचे खेळ ह्यात त्यांना गुंतवून ठेवतात. त्यांच्या प्रश्नांना कमी महत्त्व देऊन उत्तर देण्याचं टाळतात. मग ही मुलं हळूहळू अबोल, एकाकी व्हायला लागतात. आईवडिलांपासून दूर होतात, संवाद खुंटतो. आपलं एकाकीपण घालविण्यासाठी चुकीच्या मार्गांचा अवलंब करतात. नाहीतर वाईट संगतीत पडतात. कधी कधी ह्या मार्गावरून चालता चालता, इतकी दूर निघून जातात की त्याचा अंत मानसिक नैराश्येच्या खोल दरीत कोसळण्यात होतो. कळी पूर्ण उमलण्याआधीच, जीवनाचा खरा आनंद घेण्यापूर्वीच कोमेजून जाते.

आई–बाबा तुम्ही तुमच्या व्यस्त जीवनामधला दिवसातला एखादा तास आपल्या मुलांसाठी द्या.

---

संयम नसणारा बुद्धिमान मनुष्य आंधळ्या मशालजीप्रमाणे आहे. कारण हा मशालजी दुसऱ्यांना मार्ग दाखवतो; परंतु त्याला स्वतःला कधीच मार्ग सापडत नाही – कालिदास

अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्याशी बोला. संवाद साधा. वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करा. त्यांचं मन, मतं जाणून घ्या. काळाप्रमाणे बदलत जाणाऱ्या त्यांच्या आवडी निवडी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. आपली मते विचारसरणी त्यांच्यावर लादू नका. त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. फक्त यशाचे भागिदार होऊ नका तर अपयशातही त्यांच्या पाठीशी उभं राहून पुन्हा लढण्याची ताकद द्या. तुम्ही त्यांचे सर्वात चांगले मित्र, हितचिंतक व्हा! आई-बाबा होणं सोपे असतं. परंतु आईपण, बाबापण निभावण कठीण असतं. ही एक खूप मोठी जबाबदारी असते.

आपल्या समाजात हे चित्र सर्वत्र नाही. काही भाग्यवान मुले आपल्या आजीआजोबांच्या सहवासात वाढत आहेत. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे काही सुजाण पालक आपल्या मुलांना 'क्वालिटी टाईम' देण्याचा प्रयत्न करत आहेत. पण याचं प्रमाण फारच अल्प आहे. तेव्हा सर्व पालकांनी एकदा स्वतःला पडताळून पाहिलं पाहिजे की आपण नेमकं काय करायला हवं!

**- सौ. रागिणी संदीप केळस्कर**
पूर्व प्राथमिक विभाग
सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल, ठाणे

•••

दिशा
नियमित
वाचा.

*आपली
मते जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.*

(पृष्ठ क्र.१९ वरून **नर्मदा परिक्रमा**)

खिचडी आम्हाला पुरेल. अधिक झाली तर ती तुम्हालाच खावी लागेल. एक पिशवीभर खिचडी अर्थातच उरली. ती पिशवी घेऊन मी त्या स्वीपरकडे गेलो व खिचडी परत केली.

त्याला झालेला आनंद मी शब्दात वर्णू शकत नाही. मला म्हणाला 'सकाळी भेटून जा'.

म्हटले,'७ वाजता येतो, चहा मिळेल का?'

'सकाळी पाच वाजता आलात तरी चहा मिळेल' असे उत्तर घेऊन परतलो.

धर्मशाळेत येऊन चौकशी करणाऱ्या व्यक्तीला खरे वाटले नव्हते की हा प्यायलेला रामनिवास भंगी कुणा परिक्रमावासींसाठी आपल्याकडे सदावर्त मागायला आला आहे. हे आक्रित खरे आहे की रामनिवास नशेमध्ये काही बरळतोय हे जोखण्यासाठी ती व्यक्ती रामनिवासला घेऊन चौकशीसाठी धर्मशाळेच्या अंगणात आली होती हे नंतर आम्हाला समजले!

नीलकण्ठेश्वर मंदिर मैय्याकिनारी आहे. चांगल्या दहा-वीस पाऱ्यांचा घाट आहे आणि अनेक वाळू भरल्या नावा घाटाजवळ वाळू रिकाम्या करीत होत्या. पलीकडल्या तीरावर भरपूर वाळू दिसते. ती वाळू बहुधा नावांमधून विक्रीसाठी इकडे येत असावी.

मघाशी डायरी लिहिण्यासाठी मी पडवीत बसलो होतो. तिथून मैय्याचे सुरेख दर्शन होत होते. डायरी लिहिताना मला काल रात्री छिपानेर आश्रमाच्या अंगणातून झालेले सुंदर चंद्रदर्शन आठवत आहे.

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

•••

मित्र परिसासारखे असावेत म्हणजे आयुष्याचं सोनं होते.

# ओळख वनस्पतींची
# कौसी

*वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे असे तुकाराम महाराजांनी चार शतकांपूर्वी सांगून ठेवले आहे. झाडे, वेली आपल्या सतत उपयोगी पडत असतात. आपल्याला खायला अन्न देतात, इमारतीला लाकूड देतात, देवपुजेला फुले देतात, वाटसरूंना सावली देतात, जमिनीला आच्छादन देतात, श्वसनाला प्राणवायू देतात, एवढेच नव्हे तर वसुंधरेला तिचे सौंदर्य देतात. वनस्पतीशिवाय वसुंधरा अशी कल्पनादेखील आपण करू शकत नाही. एवढे त्याचे महत्त्व या चराचर सृष्टीत आहे.*

*वनस्पतींमध्ये जे विविध प्रकार आढळतात ते पाहून आपली मती कुंठित होते. त्यात काही आकाराने अगडबंब असतात तर काही अगदीच लहान असतात. काही वृक्ष डेरेदार असतात तर काही सरळसोट खांबासारखे असतात. काहींना त्यांच्या खोडांचा भक्कम आधार असतो तर काही दुसऱ्या वनस्पतीच्या आधाराने वाढतात. सर्वच वनस्पतींच्या पानांचा रंग जरी हिरवा असला तरी त्यामध्ये कितीतरी छटा असतात. नवीन कोवळे पान सुरुवातीला लालसर दिसते. नंतर ते हिरवे होत जाते. काही झाडांना फुलेच येत नाहीत तर काहींना मात्र रंगीबेरंगी फुले येतात. फुलांचे आकार आणि त्यांच्या रंगछटा आपले मन मोहून टाकतात. अशा विविधतेने नटलेल्या वनस्पतीसृष्टीची ओळख 'दिशा' मासिकाच्या वाचकांना करून देण्यासाठी हे सदर आम्ही सुरू करीत आहोत.*

*या अंकापासून प्रत्येक महिन्याच्या अंकात एका वनस्पतीची थोडक्यात माहिती दिली जाईल. त्या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकण्यात येईल. दिशा मासिकाचे वाचक या सदराचे स्वागत करतील अशी आशा बाळगतो-* संपादक

मित्रांनो, रंग कुणाला आवडत नाही? या विश्वात रंग नसते तर जगण्याला अर्थच राहिला नसता. केवळ आपल्याच आयुष्यात नाही तर निसर्गात प्रत्येक गोष्टीला असलेल्या रंगाचा त्या जीवांच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे. काही प्राण्यांना रंगाचे ज्ञान नसते, पण त्यांचे स्वतःचे रंग मात्र निर्सगात टिकून राहण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वसंत ऋतूत तर निसर्गात रंगांची मुक्त उधळण सुरू असते. ही उधळण वैशाख संपेपर्यंत चालूच असते. मध्ये थोडा विसावा. पावसाच्या चार सरी पडल्या की पुनः रंगाला उधाण येते. ही प्रक्रिया अखंड सुरू असते. फक्त रंग उधळणारी पात्रे तेवढी बदलत असतात. जंगलात शेवरी, पांगारे, पळस, बहावा, कुसुंब या सर्वांचे रंग उधळून झाले की शेंदरी रंगाची पताका घेऊन येते ती कौसी. ती सांगत येते जंगलातील रंगांचा साठा अजून संपला नाही. कितीतरी साठा अजूनही बाकी आहे. या आणि रंगांमध्ये मनसोक्त न्हाऊन घ्या. निसर्ग किती उदार असतो. कोणतीही अपेक्षा न ठेवता सौंदर्य सर्व जगाला वाटत असतो आणि किती घेशील दोन करांनी अशी आपली स्थिती होते.



आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य मोठे असते.

कौसी, अनेक वैशिष्ट्यांनी भरलेले हे झाड मध्यम उंचीचे १५ ते २० मीटर वाढणारे खोड राखाडी, सरळ व उंच वाढणारे, साल खवल्यांनी युक्त व जाड, फांद्या चहूबाजूंनी पसरणाऱ्या, फांद्यांच्या टोकाशी येणारी हस्ताकृती लांब देठाची पाने. पाने कोवळी असतांना त्यावर सुंदर लव असते. तसेच कोवळ्या फांद्यांवर देखील लव असते. पानगळीच्या मोसमात साधारण डिसेंबर जानेवारीमध्ये पाने पूर्णपणे गळून फक्त फांद्यांचा पसारा शिल्लक राहतो.

या निष्पर्ण फांद्यांवर निसर्ग मग जादूची कांडी फिरवितो. फांद्यांच्या टोकाशी मग भगव्या पिवळ्या रंगाचे लहान लहान मणी दिसायला लागतात. हे मणी लांबोडके होत लांब पेल्यासारखा आकार धारण करतात. अन् मग लाल शेंदरी रंगाने झाड भरून जाते. या लाल शेंदरी रंगाच्या लांबोळक्या नळ्या म्हणजेच कौसीची फुले होत. रूढ अर्थाने फुले म्हटले की पाकळ्या आल्याच, पण कौसीची फुले मात्र बिन पाकळ्यांची. कळीच्या भोवती असणारे बाह्य पुष्प पटल वाढत जाऊन ते नळीसारखे लांब होते. ३ सें.मी. लांबीच्या लवयुक्त नळीच्या टोकाशी थोडा फुगीर भाग असतो. त्याच फुगीर भागातून टोकावर पाच त्रिकोणी भाग विलग होऊन पेल्याचे तोंड उघडते अन् आतून पुंकेसराचा लालरंगाचा एकत्रित जुडगा डोक्यावर पिवळी टोपी घालून बाहेर येतो. त्यावर देखील नाजूक लव असतेच. ही फुले एप्रिलपासून जूनच्या सुरुवातीपर्यंत फुलत असतात. फुले म्हटली की सुंदर अन् सुवासिक अशीच आपली धारणा असते. मात्र कौसीची फुले याला अपवाद आहेत. या फुलांचा वास चक्क घाणेरडा आहे. त्यामुळेच त्यांचं शास्त्रीय नाव Sterculia Colorata असे पडले आहे. Stercu म्हणजे विष्ठा. घाणेरड्या वासाची बरीचशी फुलं स्टर्क्यूलिया या वर्गात मोडतात.

अर्थात फुलं ही दुरूनच बघायची असतात. ती झाडावरच सुंदर दिसतात. पारिजातकासारख्या काही फुलांचा अपवाद सोडला तर बरीचशी फुले अगदी सुकून जाईपर्यंत झाडावरच राहून निसर्गाच्या सौंदर्यात भर घालीत असतात. माणूस मात्र विचित्र प्राणी आहे. तो हव्यासापोटी या फुलांना ओरबाडतो; कधी स्वतःला सजवतो, तर कधी देवाला अन् कधी प्रेतालासुद्धा! बिचारे जे फुल जगाला चैतन्य देते, त्याला प्रेताशेजारी बसवायचे? किती क्रूरपणा! असो. फुलं ही फुलण्यासाठी अन् सौंदर्य वाटण्यासाठी असतात. कौसीची फुलं सुकल्यानंतरही आपला घेतला वसा टाकीत नाही. फुलं गळली की त्याच्या जागी तसेच सौंदर्याचं वरदान लाभलेल्या ५ ते ६ सें.मी. लांबीच्या लाल रंगाच्या चपट्या शेंगा गुच्छाने झाडावर दिसू लागतात. कौसीचं हे सौंदर्य पावसाळा सुरू होऊनही बरेच दिवस झाडावर शेंगाच्या रूपात बहरत असतं. हळूहळू या लाल शेंगा गळून वाऱ्यासह दूरवर उडत जातात. नवीन जग पादाक्रांत करण्यासाठी स्वतःची वंशावळ वाढविण्याची प्रत्येक झाडाची वेगवेगळी तऱ्हा असते.

हळूहळू झाडावर पंजाच्या आकाराची कोवळी केसाळ पाने येऊ लागतात. ही पाने प्रथम पोपटी व नंतर हिरवी होणारी. हळूहळू कौसी हिरवं रूप घेते अन् जंगलाच्या हिरवाईत लुप्त होते. इतका सुंदर वृक्ष मग तो जंगलातच का? त्यालाही शहरात आणायला पाहिजे. उद्यानात, सोसायट्यांच्या परिसरातही त्याला मानाचे स्थान देण्यास काय हरकत आहे! मुंबईत राणीच्या बागेत मात्र याला स्थान मिळाले आहे. शक्य आहे अजूनही काही ठिकाणी असेल. सह्याद्रीमध्ये मात्र यांची संख्या बऱ्यापैकी आहे. अन् भारतीय उपखंडात सर्वत्रच कमी-जास्त प्रमाणात तो आढळतो.

**– प्रकाश दुधलकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २५६१ ६०५१

●●●

आयुष्यात काही करून दाखवायचे असेल तर आपण काय आहोत? यापेक्षा आपण काय होऊ शकतो याचा विचार करायला हवा. जगात अशक्य काहीच नसतं.

# साठोत्तरी कवींच्या कवितेतील मृत्यू - जाणीव

*'मृत्यू' विषयाकडे पाहण्याचे मराठीतील साठोत्तरी कवींचे कुतूहलही वाखाणण्याजोगे आहे. या लेखात या विषयाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.* – संपादक

'मृत्यू' ही मानवी जीवनातील अटळ, सनातन घटना आहे. भारतीय–हिंदू संस्कृतीत या घटनेला सोळा संस्कारांपैकी एक संस्कार मानले आहे. मृत्यूमुळे निर्माण होणारा वियोग, कारूण्य याची तीव्रता कमी व्हावी म्हणून हिंदू प्रथेत हा संस्कार एक 'सोहळा' म्हणून साजरा केला जातो. मृत्यूच्या अटळतेमुळे आणि शाश्वततेमुळे 'मृत्यू' या घटनेवर आजवर अनेक साहित्यिक, तत्त्वज्ञ, कलावंत आणि शास्त्रज्ञ यांचे चिंतन झाले आहे आणि होतही आहे. साहजिकच अंतहीन अशा या विषयाकडे पाहण्याचे मराठीतील साठोत्तरी कवींचे कुतूहलही वाखाणण्याजोगे आहे.

जागतिक महायुद्धांच्या काळात जगभर मृत्यूचे भयावह तांडवनृत्य अनुभवास आले. त्यानंतर या घटनेकडे तर विशेष 'डोळस'पणे पाहिले जाऊ लागले. मानवी जीवन आणि मृत्यू यांचा अर्थ काय? याचा शोध एकाचवेळी मोठ्या प्रमाणात घेतला जाऊ लागला. एकूणच साहित्यव्यापार आणि कलाव्यापार हे अंतर्बाह्य ढवळून निघाले. त्यातूनच नितांतसुंदर अशा साहित्यकृत्तींचा आणि कलाकृतींचा जन्म झाला. भारत या महायुद्धात प्रत्यक्ष सहभागी नसल्याने त्याचे चटकेही तितक्या तीव्रतेने जाणवले नाहीत. त्यामुळे जो काही अप्रत्यक्ष असा प्रभाव जाणवला तो मर्ढेकरांच्या कवितेतून होय. त्यामुळे साठोत्तरी कालखंडात मृत्यूविषयी भाष्य करताना 'जगून थोडे अखेर मरणे' (आणखी काही कविता, पृ.५४) असा आशय व्यक्त केला. मृत्यू जरी शाश्वत असला तरी मरण्यापूर्वी मर्ढेकरांनी थोडे जगणेही गृहीत धरले आहे. या पार्श्वभूमीवर साठोत्तरी कवींच्या कवितेतून मृत्यूकडे पाहण्याचा काय दृष्टिकोन आहे हे पाहणे सयुक्तिक ठरेल.

वस्तुतः या काळातील कवींच्या लेखनात मृत्यूचे कधी सूचक तर कधी प्रत्यक्ष वर्णन, चित्रण येत असले तरी ज्यांचा 'मृत्यू' या विषयाकडे पाहण्याचा काही एक 'दृष्टिकोन' व्यक्त झाला आहे; त्याविषयी चिंतन आहे. अशाच कवींचा लेखात विचार केला आहे. त्यात अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, आरती प्रभू आणि नामदेव ढसाळ या काही विशिष्ट कवींचा येथे समावेश आहे.

– १ –

अरुण कोलटकर मृत्यू जाणिवेकडे आधुनिक जाणिवेच्या महानगरी संवेदनेतून पाहतात. त्यांच्या कवितेतून चित्रित झालेल्या मृत्युजाणिवेला अमानवीकरणाचा संदर्भ प्राप्त झाला आहे. मानवी जीवन ही मृत्यूकडे नेणारी 'आदिमयात्रा' आहे. परंतु या आदिमयात्रेचा त्यांच्या कवितेतून सोहळा साजरा होत नाही. उलट मृत्यूचा थंडगार – अलिप्त स्वीकारच त्यातून दिसून येतो.

'चरित्र' या कवितेत मृत्यूचा प्रत्यक्ष उल्लेख येत नसला तरी जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या अटळ प्रवासाचे उल्लेख तटस्थपणे येतात. जीवनात कोणतेही गांभीर्य उरले नाही; माणसाच्या जगण्याला 'माणूसपणा'चा संदर्भ उरला नाही याचे प्रभावी चित्रण कवितेतून केले आहे. त्याद्वारे मृत्यूविषयक एक 'सहजभाव' (Casualness) व्यक्त केला जातो याचा प्रत्यय आपल्याला 'ट्रक अंगावर घालणारा ड्रायव्हर पादचाऱ्याच्या अंगावर खेकसतो आहे' यातून येतो. अंगावर येणाऱ्या ट्रकच्या रूपाने मृत्यूचे अप्रत्यक्ष संसूचन आहे. आजच्या आधुनिक माणसाचे

जगणे जितके बेदखल आहे, तितकेच त्याचे मरणही बेदखल आहे हेच येथे सूचित केले आहे.

'न्यूयेरडे' ही कविता मृत्यूचे विडंबन व्यक्त करणारी कविता तर आहेच पण त्यानिमित्ताने आजच्या माणसाची झालेली विटंबनाही सूचित करणारी आहे. पोटापाण्याच्या शोधात शहरात आलेल्या मुलुखवाल्याच्या ओळखीचे (कवितागत मी) आणखी दोन मुलुखवाले त्याच शहरात येतात आणि नगण्य आयुष्य जगता-जगता नगण्य मृत्यूचे बळी ठरतात. प्रस्तुत कवितेत मृत्यूच्या दोन घटना चित्रित झाल्या आहेत. पैकी पहिल्या घटनेत एका मुलुखवाल्याच्या बायकोने नवऱ्याच्या आणि स्वतःच्याही अंगावर पेट्रोल ओतून घेतले आहे. त्यात तिचा मृत्यू ओढावतो तर दुसऱ्या घटनेत दुसरा मुलुखवाला दारू पिऊन विहिरीच्या काठावर बसल्याने विहिरीत पडून मरतो. या दोन्ही घटना नववर्षारंभाच्या पहिल्याच दिवशी घडतात. नववर्षाची सुरुवात खरे तर आनंदाने साजरी होणारी, परंतु हा आरंभच या अंतांच्या घटनांनी काळवंडलेला आहे. त्यामुळे 'न्यू इयर डे' ला 'न्यूयेरडे' चे विडंबित-विटंबित रूप प्राप्त होते. मुलुखवाल्याच्या या मृत्यूकथनांत खंत, दुःख, राग, कारूण्य अशा कोंणत्याही भावनांचा लवलेश नाही. त्यावरून कोलटकरांचा मृत्यूकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्त होतो.

मृत्यूचा असा अलिप्त, थंड स्वीकार त्यांच्या 'हॉस्पिटलमधल्या कवितां'तूनही दिसून येतो. हॉस्पिटलमधील डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय यांच्यासाठी हॉस्पिटलमध्ये आलेला प्रत्येकजण हा रूग्ण असतो; माणूस नव्हे. त्यामुळे या रुग्णांच्या भावनांना त्यांच्यालेखी काहीच किंमत नसते. हे विविध तपासण्यांसाठी आलेल्या रुग्णाच्या 'पँट भी निकालना पडेगा क्या?' या प्रश्नावर 'सब कपडा' असे थंड उत्तर येते त्यावरून लक्षात येते.

माणसाने अनेक शोध लावून आपल्या आयुष्यात भौतिक सोयीसुविधा निर्माण केल्या असल्या तरी त्या त्याच्या जीवनात प्रकाश उजळवायला आणि त्याला मृत्यूपासून वाचवायला असमर्थ ठरल्या आहेत. त्यामुळे वीजेचा शोध मृत्यूशी झुंजणाऱ्या माणसाच्या जीवनात प्रकाश निर्माण करू शकत नाही हा आशय येथे व्यक्त केला आहे. यातून माणूसही मृत्यूपुढे किती अगतिक आहे, त्यापासून दूर जाण्यासाठी तो नको नको त्या शस्त्रक्रिया करवून घेतो, नानाविध प्रक्रियांमधून जातो हा साक्षात्कार कवी येथे घडवितो. माणूस स्वतःला कितीही कर्तृत्त्ववान समजत असला तरी मृत्यूपुढे तो हतबल आहे. मृत्यूतून वाचण्यासाठी डॉक्टर, नर्स असे कुणाकुणाच्या हाती स्वतःला सोपवितो; अगदी हजामापुढेही निमूट बसतो. मग असा हतबल झालेला माणूस जगावर काय हक्क सांगणार, हा प्रश्न कवी उपस्थित करतो. या हतबलतेचा प्रत्यय पुढील ओळींतून तो घडवितो -

*''मी मेणाचा बाहुला*
*चिकणा हिजडा*
*भादरलेला''*

म्हणूनच मानवी पराक्रमाला असमर्थ ठरविणाऱ्या मृत्यूची अगतिकता कवी उपरोधिक शब्दांतून मांडतो आणि स्वतःचीही आत्मनिर्भत्सना करण्यास मागेपुढे पाहात नाही.

उपचाराचा भाग म्हणून वयाच्या बाह्य शरीरावरील केस काढून त्याला चिकणा बनविले जाते; तर शरीरांतर्गत एनिमा देऊन त्याची आतडी धुऊन काढली जातात. हा अंतर्बाह्य शरीराचा स्वच्छपणा पाहून कवी म्हणतो की, 'अंतर्बाह्य स्वच्छपणा माझ्या मनात उपरोध निर्माण करतो. जीवन हे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ असूच शकत नाही. असा स्वच्छ माणूस आजचे आधुनिक जीवन जगण्यासाठी नालायक ठरतो. या व्यवहारी जगात इतका स्वच्छपणा अप्रस्तुत, अवाजवी व अस्थानी आहे. म्हणून मग मला हातगाडीवर टाका, माझ्यावर स्वच्छ चादर पसरा' असे तो सांगतो. यातून कवी येथे प्रतीकात्मक मरणच अनुभवतो आहे.

---

जीवनात मागे बघाल तर अनुभव मिळेल. जीवनात पुढे बघाल तर आशा मिळेल. इकडे-तिकडे बघाल तर सत्य मिळेल आणि आपल्या स्वतःच्या आतमध्ये बघाल तर आत्मविश्वास मिळेल.

मृत्यूपुढे सगळी शस्त्रे आणि शास्त्रे कशी हतबल ठरतात याचे थेट, अलिप्तपणाने केलेले चित्रण पुढील ओळींमधून व्यक्त होते –

*''सलाईनाचा थेंब विश्वाचे केंद्र होऊन राहिलाय*
*उजवा हात संबंध आखडून गेलाय''*

विश्वरूपाचा अनुभव माणूस हा त्याच्या शरीरावयवांच्या–पंचेंद्रियांच्या माध्यमातून घेत असतो. म्हणूनच शरीरावयांमध्ये काही बिघाड झाला तर विश्वासंबंधीचा अनुभवदेखील थिटा ठरू शकतो. शरीरावयवाचे चलनवलन सुरळीत चालण्यासाठी मग त्याला सलाईनचा आधार वाटतो. तेव्हा सलाईनचा थेंब हाच विश्वाचे केंद्र बनून जातो. इतकी मृत्यूपुढे जीवनाची आणि जगताची अगतिकता तो कोणतीही खंत, तडफड वा प्रक्षोभ व्यक्त न करता अनुभवतो, सोसतो. मृत्यूच्या समीप नेणाऱ्या या व्याधींना दूर लोटण्यासाठी रामदासाचा ग्रंथही त्याच्या जीवनात कोणताही हातभार लावण्यासाठी उपयोगी नाही हेच तो येथे निदर्शनास आणून देतो.

या कवितेतील मृत्यूचे दर्शन हे केवळ व्याधी आणि हॉस्पिटमधील वास्तव्यातून घडत नाही; तर मृत्यूची सार्वभौमता आणि सर्वाधीनता कविला आजूबाजूच्या वस्तूंच्या सहवासातूनही जाणवते. या वस्तूही मृत्यूसारख्याच सर्वभक्षी झाल्या आहेत. म्हणून कविला रद्दीच्या पानापानांवर साप व्यालेले दिसतात. रद्दीच्या चळथीतून सापांच्या पिलांची चुळबूळ चाललेली दिसते. तसेच रद्दीचा कोपराही फणा काढून जिभल्या चाटताना दिसतो. त्यामुळे मृत्यूची सर्वभक्षी प्रवृत्ती त्याला खेकड्यांनी त्याच्याकडे टपून पाहण्यातूनही जाणवते. तर 'कांबळं' या कवितेत खांद्यावर कांबळं घेऊन मृताच्या नातेवाईकांना गावोगावी निरोप पोहोचविणाऱ्याच्या आयुष्यात मृत्यूचा निरोप आणि कांबळं याचं समीकरणच होऊन बसते. परंतु कवितेतील कांबळं हे कविच्या जीवनात केवळ निरोपाचे सूचन नसून त्याने कवीच्या अवघ्या शरीरमनालाच व्यापून टाकले आहे. याशिवाय 'बर्फावर उघडी लाश', 'काळोख मरणाच्या ओंजळीने काळोख पितो', 'मेणाच्या थारोळ्यात ज्योतीशी लढून आता वात सुखाने मरते', 'देवळात मेलेल्या कुत्र्याचे मढे', 'मेलेला बैल', 'स्टॅलिनचे मरण' ही मृत्यूची विविध रूपे आणि त्यावरील कविची भाष्ये येतात. अशा प्रकारे पशू–पक्षी–प्राणी–वस्तू यांची मृत्युवत सर्वभक्षिता लक्षात घेता ही कवितेतून व्यक्त झालेली मृत्यू – जाणीव अमानवीकरणाशी निगडित आहे, असे म्हणता येते. येथे मृत्यूचे जसे उदात्तीकरण नाही तसेच मृत्यूविषयी कोणतेही तत्त्वज्ञान सांगितले जात नाही. हा मृत्यूविषयी पलायनवादी दृष्टिकोन नसून मृत्यूचा थंड अलिप्त स्वीकार आहे. या मृत्युकल्पनेला औपरोधिकतेचा पदर असून, त्यात कारुण्यभावाचा लवलेशही आढळत नाही. आजच्या आधुनिक माणसाचा तो अटळ चेहरा आहे हेच येथे अधोरेखित होते.

– २ –

दिलीप चित्रे यांच्या काव्यचिंतनात मृत्यूविषयीच्या चिंतनालाही महत्त्वाचे स्थान आहे. 'मृत्यू' या जाणिवेकडे पाहण्याची त्यांची स्वतःची खास 'दृष्टी' आहे. मुळात अस्तित्त्वभानाविषयी सजग असणाऱ्या या कवीच्या अस्तित्त्वजाणिवेला विश्व–जाणीव, रती–जाणीव आणि मृत्यू–जाणीव या जाणिवांच्या पदरांची वीण आहे.

मृत्यूविषयक चिंतन येणाऱ्या कवितांमधून मृत्युतूनच जीवनजाणिवेचे–अस्तित्वजाणिवेचे येणारे भान, जीवनमरणाची बरोबरी मृत्यूतील कुरूपता–विकटता आणि मृत्यूची अगतिकता तसेच मृत्युमुळे जीवनात निर्माण झालेली निरर्थकता अशा आशयसूत्रांचा समावेश झाल्याचे दिसून येते.

'मृत्यू' या कवितेत कवी स्वतःचा प्रतीकात्मक मृत्यू अनुभवतो आहे. या कथित मृत्यूचा क्षण अनुभवताना खरं

---

आशा ही विचित्र श्रृंखला आहे. तिने बांधलेला माणूस भरधाव धावतो व न बांधलेला माणूस लुळापांगळा होतो.

म्हणजे जगताना अवकाशातील ओशाळणारी हवा, झुळुकांचे नाहीसे होणारे किनारे, वाऱ्यावरली थिजणारी तीव्र कस्तुरी, तळहाताखालची भिजणारी वाळू, चांदण्यातल्या चांदण्यात निजणारे रक्त, तलावातील हरविणारे होड्यांचे हंस, काळोखात उजळणारे माध्याह्नाचे गोमेद, अज्ञात दगडावरून वर फेसाळून पसरणारे रक्ताचे धबधबे, सचैल न्हालेली जाणीव आणि त्यावर सूर्यासारखा सरकणारा ज्वलंत ओला अनोखी थेंब या साऱ्या क्रिया-आंतरक्रिया कविला त्याचे मरण अनुभवायला लावतात. या मृत्यूजाणिवेतूनच त्याला जीवनजाणिवेचा साक्षात्कार होतो. काहीतरी मरतेय याचा अर्थ काहीतरी जिवंत होतेय. या 'काहीतरी' असण्याचा साक्षात्कार कविला मृत्यूजाणिवेतूनच होतो. त्यामुळेच मृत्यू आणि समागम एकाच पातळीवर येतो. या दोन्ही जाणिवेतील सायुज्यता तो अनुभवतो. त्याच्या मते प्रत्येक समागम हा एक मृत्यूच ठरतो. 'जुलै ५६' या कवितेत कवी पुढील आशय व्यक्त करतो –

*''मृत्यूहूनही निश्चित आज माझे ओठ तू ज्याचे चुंबन घेतलेस*
*फुलांच्या पाकळ्या*
*गळून पडताना उमगेल तुलाही अवकाशरहस्य*
*...किती किती रूपे सरकतात तुझी डोळ्यांमधून*
*मावळत्या दर्पणात, जिथे सूर्य बुडतात ...*
*प्रत्येक तुझ्या हालचालीत ती लय आहे मृत्यूमयी*
*आणि वाहात जाणारी, झाकळती कुसुंबी संध्येच्या*
*सरोवरात''*

(कविता पृ. ४५)

'धृवपद'(एकूण कविता – ३ पृ. ७२७) या कवितेत मृत्यूच्या जाणिवेतून जीवनानुभूतीची, अस्तित्वानुभूतीची जाणीव निर्माण होते. हा आशय खालील ओळींतून प्रतीत होतो –

*''या मरणांतून पुन्हा अस्तित्वाच्या शुद्ध ज्वाला*
*बाहेर पडतील, पालवी बनतील, पाणी होतील*
*पुन्हा शरीर धारण करील वासंतिक उन्मेष*
*पुन्हा रस स्त्रवतील, पुन्हा पशू हुंदडतील*
*पुन्हा वेदनांच्या रानोवनी सुखे फुलोरतील''*

(कवितेनंतरच्या कविता, पृ.८८)

प्रस्तुत कवितेतून मृत्यूचे जे भान व्यक्त होते त्यानुसार कवीने कोणत्याही क्षणी जीवनाच्या प्रवाहातून मरणाच्या कुरळ्या लाटा कधीच वेगळ्या केल्या नाहीत आणि हेच आपल्या मृत्यूचे वैशिष्ट्य आहे, असा आशय प्रकट केला जातो. मृत्यूचे भान सातत्याने बाळगल्यामुळेच चित्रे यांच्या कवितेत वर्तमान क्षणाला महत्त्व प्राप्त होते. प्रत्येक क्षण अर्थपूर्ण, उत्कटपणे जगण्याची ओढ निरंतर राहते. त्यामुळे जीवनातील रतिभावालाही या कवितेत महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. किंबहुना रतिभावालाही मृत्युजाणिवेतूनच उत्कटतेची गहिरी डूब प्राप्त होते. कारण आपली प्रेयसीदेखील 'मृत्युमयी' असल्याचा त्याचा अनुभव आहे. यावरून मृत्युशोधातूनच आत्मशोध घेणारा हा कवी आहे हेच येथे लक्षात येते. 'मृत्यू' या कवितेचेही हेच प्रतिपाद्य आहे. वस्तुतः माणसाला लौकिक मृत्यू अनुभवता येत नाही. परंतु काल्पनिक मरण तो अनुभवू शकतो. असा मृत्यू अनुभवल्यानंतर कवीला सचैल स्नानाचा आनंद मिळतो. हे स्नान अस्तित्वानुभूतीची जाणीव करून देते. हा प्रतीकात्मक मृत्यू अनुभवल्यानंतर नव्या जन्माचा आरंभ होतो. म्हणूनच कवी 'एकदा आत्महत्येच्या कड्यावर' या कवितेत म्हणतो –

*सगळी माणसं ज्या कड्यावर*
*कधी ना कधी येऊन उभी राहतात*
*ते तर माझं जन्मस्थान होय*
*मरणं किती सोपं आहे!*
*त्याचा अनुभवसुद्धा येत नाही*
*स्वतःतच गुरफटून गुरफटून*
*मरण किती सोप आहे!*

(कविता, पृ. ७१)

---

प्रगतीचा मार्ग चुकांच्या काट्याकुट्यांतून जातो. जो या काट्या-कुट्यांना भितो त्याची प्रगती कधीच होत नाही.

जीवनजाणिवेचा–अस्तित्वजाणिवेचा शोध हा मृत्यूजाणिवेतूनच लागतो हेच येथे कवी निदर्शनास आणून देतो. म्हणजेच मृत्यूतून नव्या जन्माचा आरंभ असल्याने मृत्यूच्या अंतिम यात्रेतूनच जीवनाची आरंभयात्रा सूचित होते.

दिलीप चित्रे यांच्या कवितेतून स्वमरणाचे जसे उल्लेख येतात तसेच इतरांच्याही मरणाचे उल्लेख येतात. येथे नमूद करण्यासारखी बाब म्हणजे जेव्हा स्वमरणाचे उल्लेख येतात ते मरण काल्पनिक, प्रतीकात्मक, काव्यात्म स्वरूपाचे असते तर इतरांच्या मरणांचे उल्लेख येतात तेव्हा त्या मरणातील कुरूपता, विकटताच कवी चित्रित करतो. याचा प्रत्यय आपल्याला 'आजीचे मरण', 'के. मा. जोशी निपुत्रिक वारलेले, पारद्रष्टे यांच्या मर्तिकाचे भजन', या कवितांमधून येतो. 'आजीचे मरण' या कवितेत एका अस्तित्वाचे संपुष्टात येणे ही जी प्रक्रिया आहे ती वर्णिली आहे. त्यातील कुरूपता कवी येथे व्यक्त करतो. एकूणच कवितेत मृत आजीचे जे उल्लेख येतात ते मृत्यूविषयी बीभत्स–ओंगळवाणे दर्शन घडवितात. आजी गेल्यानंतर कवीच्या मनात कोणती प्रतिक्रिया उमटली त्याचे चित्रण कवी करीत आहे. या चित्रणात कुठेही खंत, खेद वा दुःखावेग नाही. उलट दुःखातही तो वर्तमानाचे भान विसरत नाही. हे वास्तवाचे त्याचे भान 'आजी ही निर्माल्य बनली आहे', 'ती चिमणीसारखी विसराळू बनेल','जळत असताना ती गुरुत्वाकर्षणाविरुद्ध उंच उंच सूर मारून जाईल', 'ती नियमानुसार खोल खोल बुडून जाईल', 'आजीने घर सोडलेय' अशा संदर्भांतून जागे असल्याचे दिसून येते. येथे मरणाविषयी आक्रोश, दुःखावेग नसून तटस्थ स्वीकार आहे. तर 'के. मा. जोशी...' या कवितेत मृत्यूने जीवनाची ठरविलेली निरर्थकता अधोरेखित केली आहे –

*''तुम्ही आता उघाडीला आलात*
*तुमच्या भाषेचा धबधबा*
*आता विरळ होत चाललाय*
*तुमचे डोळे आता खोटे पडलेत*
*आणि तुमची त्रिकालदर्शी जीभ*
*आता टाळ्याला चिकटलीय''*

(कवितेनंतरच्या कविता, पृ.११२)

माणसाने प्राप्त केलेल्या ज्ञानाला, त्याच्या कर्तृत्वाला, त्याच्या अहंकाराला मृत्यू कसे उघडे पाडतो हेच येथे लक्षात आणून दिले जाते. जोशींनी स्वतःला लावलेल्या 'पारद्रष्टे' या उपाधीतील वैयर्थ येथे अधोरेखित होते. तसेच मृत्यूने अधोरेखित केलेली माणसाच्या क्षुद्रत्वाची जाणीव आणि त्याच्या कालिक क्षमतांची मर्यादा या पार्श्वभूमीवर काळाची अपार–अगाध अखंडता यांच्यातील विरोधाभास यातून व्यक्त केला जातो. तसेच 'त्यांच्या नाकफुड्यांत बोळे कोंबलेत', 'त्यांच्या स्मरणशक्तीत कापूस पिकलाय', 'त्यांची नाडी बंद पडलीय', 'त्यांचे हात थंडगार झालेत','त्यांचे पितळी कपाळ झोपलेय' अशा मृत्युबोधक उल्लेखांमधून मृत्यूतील कुरूपता आणि अगतिकताच दिसून येते. शेवटी एका पारद्रष्ट्यालाही मृत्यूपुढे कशी हार मानावी लागते यातून मृत्यूची अटळताच कवी अधोरेखित करतो. थोडक्यात मृत्यू आहे म्हणून जीव आहे, जगत आहे आणि जगणंही आणि ते उत्कटतेने जगले पाहिजे हे निदर्शनास आणून देतात.

– ३ –

आरती प्रभूंच्या कवितेतील मृत्युविषयक चिंतन हा त्यांच्या भावविश्वाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. या मृत्युविषयक चिंतनाचे सूत्र त्यांच्या *'रेताच्या प्रत्येक थेंबात। एका नव्या प्रेताचा जन्म असतो'* (दिवेलागण पृ.२४) या शब्दांतून व्यक्त झाले आहे. या मृत्यूची अनेकविध रूपे त्यांच्या कवितेतून साकार झालेली आहेत. 'मरणमाडी' या कवितेतून जीवन हे नश्वर आहे आणि मृत्यू अमर आहे हा आशय सूचित होतो. प्रत्येकाला

अपरिहार्यपणे मरणमाडी चढावीच लागते. येथे मागे वळणे नाहीच; आहे ती केवळ दरी. त्यामुळे मरणमाडी चढण्याची सक्ती आहे. येथे कविला माणसे लाकडाचीच झाडे भासत आहेत, जी उद्या सरणांत जळणार आहेत. तर हाडे चुन्याची तर पावले कातड्याची दिसत आहेत. यातून प्रत्येक जीव कविला मृत्यूचे भक्ष्य दिसतो. येणारा प्रत्येक क्षण हा मृत्यूच्या अधिकाधिक जवळ नेणारा आहे आणि जीवन जगत असताना माणसाच्या मनावर जो दैनंदिन जीवनाचा तवंग चढतो तो फुंकून पाहिल्यावर मात्र तळाशी त्याला माणूस मर्त्य आहे हाच जीवनाचा अर्थ सापडतो. त्यामुळे जीवन जगताना मृत्यूचेही भान राहणे; या व्यक्त झालेल्या आशयातून कवीची मृत्यूविषयक जाणीव व्यक्त होते.

आरती प्रभूंचा मृत्यूकडे पाहण्याचा दृष्टिकोन काही बाबतीत हिंदू परंपरेचा अंगीकार करणारा तर काही बाबतीत परंपरेला छेद देणारा आहे. मृत्यू म्हणजे आत्म्याने जीर्ण वस्त्रे त्यागून नवी धारण करणे ही धारणा आरती प्रभूंच्या कवितेतून आढळत नाही. त्यांच्या 'मृत्यू' या कवितेत मरणाचा सोहळा साजरा होत नाही. तसेच मृत्यूचे तत्त्वज्ञान वा उदात्तीकरणदेखील व्यक्त केले जात नाही. उलट मृत्यूचा ते वास्तव पातळीवरून विचार करतात. मृत्यू त्यांना जीवन संपविणारी शोकात्मिकाच वाटते. 'आशावादी' (नक्षत्रांचे देणे पृ.८१) या कवितेत 'माणसाचे आयुष्य हे अटळपणे मृत्यूकडे वाहणारी जीवनधारा आहे' हा आशय ते व्यक्त करतात –

*''मरेपर्यंत मरण्याचे व्रत तुझे*
*माणसासारखा जगून मोडू नकोस!*
*अखेर प्रवाहातून वाहणारे प्रेत तुझे*
*सागरास मिळणार आहे, भिऊ नकोस''*

(दिवेलागण पृ.७१)

जीवनात जोपासलेला आशावाद कसा चकवा देणारा आहे हेच येथे कवी सूचित करतो. मरेपर्यंत मरण्याचे व्रत अखंडपणे जोपासणारा, तसेच मृत्युरूपी सागरास मिळणारा परंतु जगताना प्रेतवत जगणारा हा माणूस पाहून कविच्या मनात कारूण्य निर्माण होते. मानवी जीवन किती क्षणभंगूर, नााशिवंत, निरर्थक आणि क्षुद्र आहे याचा साक्षात्कार कवी घडवीत आहे. अशा मृत्यूच्या विविध परी कवी 'मृत्यूत कोणी हासे' या कवितेतून चित्रित करीत आहे. कोणी मृत्यूत हसतो, कोणी मृत्यूला हसतो; कोणी हसून मरतो तर कोणी मरणाऱ्याला हसतो असे कवीचे सांगणे आहे. येथे कवी मृत्यूच्या प्रत्येक रूपाला हास्यास्पद ठरवून मृत्यूविषयीचा उपरोध व्यक्त करीत आहे. तसेच जीवनातला उपरोध आणि निरर्थकता 'उंट' या कवितेतूनही व्यक्त होते. जीवन जगताना माणूस भरभरून जगण्याची धडपड करीत असतो. जीवनाला अर्थ देण्यासाठी झटत असतो. परंतु मृत्यूची अटळता तो टाळू शकत नाही वा त्याला चकवाही देऊ शकत नाही.

*''दिवे लागते तरी काळरात्र संपत नाही..*
*संपणार नाही*
*प्रेताच्या बहिऱ्या कानाशी*
*बसून असतो इमनी आत्मा;*
*रेताच्या प्रत्येक थेंबात*
*एका नव्या प्रेताचा जन्म असतो;*
*शोकगीतासारखी वळत असते दूरवरून*
*त्याच्या पावलांची वाट''*

(दिवेलागण पृ.२४)

उंट ही प्रतिमा मरणाला उद्देशून येते. येथे दिवे लागणे तात्कालिक ठरते आणि मरण मात्र अमर शाश्वत ठरते. त्यामुळे काळरात्र संपत नाही. उगाच दिव्यांच्या लखलखाटाने लौकिक क्षणिक सुखाने माणसाला सुखाचा आभास होत असला तरी सत्य मात्र 'मरणदिवा' आहे. या मरणदिव्याच्या प्रकाशातच माणसाने जीवनाची वाटचाल केली पाहिजे. परंतु तसे होत नाही. माणूस अमर आहे. हे गृहीत धरूनच तो सर्व कृती करीत असतो. त्यामुळे

मृत्यू अटळ आहे असे माहीत असूनही तो स्वतःची आणि इतरांचीही फसवणूक करीत राहतो. हा आशय *'सुखरूप आम्ही सुखरूप आम्ही, सर्वांत आम्ही सर्वांप्रमाणे'* (नक्षत्रांचे देणे पृ.३) या ओळींमधून व्यक्त होतो. प्रत्येक जण येथे सुखी असल्याचे नाटक वठवितो आणि प्रत्यक्ष मरणाच्या दुःखातूनही सुखाचा मुखवटा चढवून जगत राहतो. त्यामुळे त्याच्या जगण्याला शोकान्तिकेची डूब प्राप्त होते. 'उगीच मधले हे' (दिवेलागण, पृ.८४) या कवितेत मृत्युजाणिवेबरोबरच नियती कल्पनाही माणसाच्या अटळ एकटेपणाशी जोडून आलेली आहे. भोवताली सगळे आप्तस्वकीय असूनही जगताना आणि मरतानाही माणसाला आपला प्रवास एकट्याने करावा लागतो ही त्याची नियती आहे असा भाव व्यक्त होतो. आपल्या सग्यासोयऱ्यांमध्ये राहूनही वेळू-वाळूच्या कर्कश किनाऱ्यालाच माणसाला अनुभव यावा, लौकिक जीवन जगताना अलौकिकाचा गूढाचा ध्यास लागावा हा अटळ एकटेपणा, निराशा, निरर्थकता अगतिकता अस्तित्त्ववादी वा आधुनिक जाणिवेशी निगडित नाही. त्यांच्या कवितेतील मृत्युविषयक चिंतन सामाजिक-राजकीय जाणिवेशी संबंधित नाहीत तर 'माणूस हा मर्त्य आहे आणि तो नियतीच्या हातातले खेळणे आहे' या पारंपरिक धारणेशी निगडित आहे.

जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणजे 'कोणी अवलियाने ओढलेला गांजा आहे' या दृष्टिकोनातून कवी जीवनाकडे पाहतो. आयुष्य ही एकट्याचीच वाटचाल आहे. हा एकटेपणाचा शाप जन्मापासून मृत्यूपर्यंत भोगण्याची नियतिकृत सजा त्याला भोगावी लागते. याचे चित्रण 'गाडा' या कवितेतून झालेले आढळते -

*''कुणासाठी कुणासाठी, कशासाठी, कुठवर*
*रेटायचा, ऐसायचा गाडा इमानाने जन्मभर?*
*गाणे सुरू झाले तेव्हा चंद्र होता डोईवर*
*गाणे मध्यावर आले - चंद्र झाला रानभर*
*गाणे संपले आणिक पक्षी फडफडला तमी*
*आणि तसाच मिटला घरट्यांत ....अंतर्यामी''*

(नक्षत्रांचे देणे, पृ.२९)

आरती प्रभूंच्या कवितेतील माणसाला 'आला, जगला आणि मेला' यापरते अर्थ नाही; या जगण्याला कोणतेही मूल्य प्राप्त होत नाही. त्यामुळे कवितेतून घेतलेला मृत्यूचा शोध-बोध हा जीवनाच्या अर्थयुक्ततेसाठी, मूल्ययुक्ततेसाठी नाही; तर मृत्यू हा अटळ असल्याने जीवनही निरर्थक आहे याच भावनेतून हा बोध होतो आणि जर कधी हा शोध बोध झालाच तर तो 'दिगंबर' होण्यातून; सर्व प्रकारच्या निःसंगतेतून होणार आहे. (दिवेलागण, पृ.३९) हा कवीचा विश्वास आहे. तोच आयुष्य ही एक 'विस्तीर्ण विराणी' आहे हे कवीचे सांगणे आहे. त्यामुळे जीवनाचा अधिक खोलवर शोध घ्यावा तितके त्याच्या तळाशी मृत्यूचे होणारे दर्शन हे कविला उमगलेले सत्य आहे. अशा या मृत्यूची अटळता, भयावहता, त्यातून मानवी जीवनाची होणारी शोकांतिका आणि कारूण्य या आशयसूत्रांना आरती प्रभूंच्या कवितेत स्थान मिळालेले आहे. अशा प्रकारे त्यांच्या कवितेतील दुःखाची जाणीव आणि मृत्युजाणीव नियती जाणिवेशी संलग्न आहे. हे व्यक्त झालेले दुःख यंत्रयुगीन जाणिवेशी संलग्न नाही. तसेच या दुःखाला आजच्या माणसाच्या जीवनातील दैन्य, दास्य अशा समस्यांमधून निर्माण झालेल्या शोषणाचाही संदर्भ नाही. त्यामुळे आरती प्रभूंच्या कवितेतील दुःखानुभूतीची जात ही वैयक्तिकच राहाते. तिचे साधारणीकरण होत नाही. हे दुःख, ही वेदनानुभूती सर्वसामान्यांच्या दुःखाचे प्रतिनिधित्व करीत नाही. कारण आरती प्रभूंना मृत्यूविषयी, नियतीविषयी पडलेले प्रश्न आरती प्रभू या कविपिंडाचे भावधर्म प्रतिबिंबित करतात. या वेदनानुभूतीला सामाजिक, सांस्कृतिक संदर्भातून प्राप्त झालेले किडामुंगीचे मरण असा संदर्भ क्वचितच प्राप्त होतो.

---

जगात दुसऱ्याला हसणे सोपे; पण दुसऱ्यासाठी रडणे कठीण.

– ४ –

नामदेव ढसाळ यांच्या कवितेत येणारा मृत्यू जरी अटळ असला तरी ज्यावर माणसाचे नियंत्रण नाही त्याविषयी अधिक चिंतन करून आपल्या ऊर्जेचा अपव्यय तरी का करावा असा भाव व्यक्त होतो. 'मंदाकिनी पाटील : मला अभिप्रेत असलेले कोलाज' या कवितेत बलात्कार झालेल्या मंदाकिनीने आत्महत्येचा मार्ग स्वीकारू नये म्हणून कवी मंदाकिनीला 'मरणानंतर माणूस हा धूर आणि धुरळा असतो' हे पटवून देत आहे. असाच आशय 'डॉ. आंबेडकर' या कवितेतूनही व्यक्त होतो. जीवन हे जगण्यासाठी आहे; मरण्यासाठी नव्हे हे येथे अधोरेखित केले आहे. मृत्यू हा सर्वच गोष्टींचा शेवट असला तरी जन्म आणि मृत्यू या दोन बिंदूंमधील आयुष्य तुम्ही किती सुंदर, अर्थपूर्ण बनविता हे महत्त्वाचे आहे. तर 'खेळ' या कवितेत ढसाळ 'मृत्यूपेक्षा श्रेष्ठ आहे प्रेम' (खेळ, पृ.२०) असा स्पष्ट निर्वाळा देतात. कारण मृत्यू हा लौकिक जीवनाचा अंत आहे, तर प्रेम माणसाच्या मनातील द्वेषाचा अंत आहे. त्यामुळे ढसाळ यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या दृष्टिकोनानुसार मृत्यूनंतर जर काहीच नाही तर मृत्यूचा विचार सतत बाळगण्यापेक्षा त्यावर मात करावी हे विरोचित भान त्यातून व्यक्त होते. उदा.–

*''मरण चुकत नाही कोणाला*
*पिंजऱ्यात पिंजरे दडलेल्या तक्षकालाही*
*मृत्यू कसा बोटाच्या अळीत बसून शोधतो*
*आपल्या सावजाला*
*मावश्ये, यापुढे आवडेल मला मृत्यूशी बुद्धिबळ खेळायला*
*रात्रीच्या काळोखात एकमेकांना खात सुटलेल्या घोड्यांची*
*मावश्ये, मला भीती वाटत नाही*

(या सत्तेत जीव रमत नाही, पृ.१३३)

मृत्यूने निर्माण केलेली अपूर्णता ही ढसाळ शोषित माणसाच्या अभ्युदयात शोधतात. त्यासाठी हा विरोचित भाव उपयोगी ठरतो –

*''भीतीपेक्षा मरण तरी बरं*
*कसलं झेंगट पाठी पुन्हा मरणं*
*पुन्हा जिवंत करणं पुन्हा मारणं*
*मलाही शहीद व्हायचंय*
*माझ्या माणसांसाठी''*

(या सत्तेत जीव रमत नाही. पृ. ११४)

तसेच व्यवस्थेने ज्या माणसांचा जन्मच मृत्यूचा पिंजरा बनविला आहे त्यांना मृत्यूची भीती वाटत नसते हाही मृत्यूविषयीचा एक वेगळा दृष्टिकोन कवी व्यक्त करीत आहे. कवी लिहितो –

*''त्यांच्या निसर्गदत्त जगण्यालाच जर तुम्ही नागिणीच्या पानासारखे*
*खुडू जाल, तर जहर भिनेल नकळत तुमच्या शरीरात*
*चुटकीसरशी उडून जाईल तुमचा घाणेरडा आत्मा*
*डोक्याला कफन गुंडाळून आलेली ही पोरे करवदून नाही*
*स्मशान काय, कैद काय, वाटेल ते हसतमुखाने स्वीकारतील ती''*

(मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले पृ. २–३)

हा मृत्यूविषयीचा दृष्टिकोन जीवनातील अपूर्णता, अगतिकता, निरर्थकता शोधण्यातून व्यक्त होत नाही; तर ज्या दलित सर्वहारांच्या जगण्यालाच या व्यवस्थेने मृत्यूचा सापळा बनविला आहे त्या व्यवस्थेच्या रचित्यालाच कवी लक्ष्य बनवितो. त्यामुळे मृत्यूनंतरच्या स्वर्गाचेही कविला अप्रूप वाटत नाही. कारण कविला या लौकिक जीवनातच स्वर्ग फुलवायचा आहे. मृत्यूच्या सर्वभक्षितेपेक्षा जीवनाच्या सर्वभक्षितेकडे ढसाळ अंगुलिनिर्देश करतात. दलित सर्वहारांचे शोषण करणाऱ्या वर्णवर्ग व्यवस्थेचे कुटील कारस्थान उजेडात आणतात आणि ज्यांनी हे कुटील कारस्थान राबविले त्यांच्याही मृत्यूची दवंडी कवी पिटतो आणि प्रसंगी स्वतःही बळी जायला तयार होतो. 'रत्नमाला निळे' या कवितेत कवी जीवनातली अपूर्णता

---

दुर्बल व्यक्ती एखादे उच्च ध्येय समोर ठेवून समाजात वावरू लागते तेव्हा धाडस व साहस हे गुण तिच्यात आपोआप येतात.

चित्रे यांच्यासारखीच रतिभावात शोधतो. म्हणूनच प्रस्तुत कवितेत रत्नमालाला उद्देशून 'आयुष्य बनवून टाकलंस ढोर मातीसारखं सुंदर' (या सत्तेत जीव रमत नाही, पृ.१००) असा इहवादी दृष्टिकोन व्यक्त केला जातो.

थोडक्यात, ढसाळ मृत्यूचा थंड वा अलिप्त स्वीकार करीत नाहीत. तर आपल्या माणसांसाठी शत्रूचा प्रसंगी जीव घेण्याची वा स्वतःचा जीव देण्याचीही तयारी ठेवतात आणि मृत्यूशी खेळण्याची भाषा करतात. यातून त्यांचा मृत्यूविषयीचा विरोचित भाव प्रकट होतो.

– ५ –

एकूणच साठोत्तरी कवितेचा विचार करता आरती प्रभू,दिलीप चित्रे, अरुण कोलटकर यांच्या कवितेत 'मृत्यू' या जाणिवेला काही एक स्वतंत्र स्थान आहे. त्यातून त्यांचा मृत्युविषयक 'स्वविशिष्ट' दृष्टिकोन प्रकटला आहे. यातील आरती प्रभू आणि दिलीप चित्रे मृत्यूकडे एक अटळ घटना म्हणून पाहतात. त्याविषयी आपले चिंतन प्रकट करतात. ढसाळ मात्र मृत्यूने निर्माण केलेली अगतिकता दुय्यम मानून जन्म आणि मृत्यू यामधल्या आयुष्याला काही एक अर्थ दिला पाहिजे हा भाव व्यक्त करतात. आरती प्रभूंच्या कवितेत मरणाची सक्ती व्यक्त होते तर दिलीप चित्रे आणि ढसाळ यांच्या कवितेत जगण्याची आसक्ती व्यक्त होते. किंबहुना मृत्यू आहे म्हणून उत्कटतेने आणि भरभरून जगले पाहिजे हा भाव चित्रे व्यक्त करतात. त्यामुळे मृत्यूविषयीच्या सततच्या भानातून वर्तमान अधिक उत्कट आणि अर्थपूर्ण होतो. आरती प्रभू मृत्यूच्या अटळतेमुळे खंतावलेले दिसतात. मृत्यू माणसाची अटळ नियती असल्याने माणूस एकटा येतो आणि एकटा जातो हा भाव त्यांच्या कवितेतून पुन्हा आवृत्त होतो. त्यातून जीवनाची निरर्थकता अधोरेखित केली जाते. तर ढसाळ जीवनाकडे आणि मृत्यूकडेही रचनात्मक दृष्टिकोनातून पाहतात. 'सत्ता' या कवितेत हा भाव 'आयुष्य मला आवडू लागलं आहे' आणि 'मातीच्या वैभवात जीव पडला आहे अडकून' अशा ओळींमधून व्यक्त होतो. जीवन हे सुंदर, अर्थपूर्ण आहे; ते आनंदाने, जबाबदारीने जगण्याची गोष्ट आहे याचे भान ढसाळ व्यक्त करतात आणि मृत्यूने निर्माण केलेली अगतिकता धुडकावून लावतात. अरुण कोलटकर मृत्यूचा थंड अलिप्त स्वीकार करतात. त्यामुळे त्यातून एक उपरोध व्यक्त होतो. ही मृत्यू–जाणीव आजच्या आधुनिक महानगरी जाणिवेशी निगडित आहे. त्यांच्या कवितेतून आजच्या माणसाचे जगणे जसे बेदखल झाले आहे, तसेच त्याचे मरणही बेदखल झाले आहे. त्यांच्या कवितेत मृत्यूच्या सर्वभक्षितेला अधोरेखित केले जाते; तर ढसाळ यांच्या कवितेत विशिष्ट वर्गवर्णाच्या जीवनाला नष्ट करू पाहणाऱ्या व्यवस्थेच्या भक्षितावस्थेला अधोरेखित केले जाते. त्यामुळे कोलटकरांच्या कवितेत यंत्रयुगातील आधुनिक जाणीव, महानगरी जाणीव जबाबदार ठरतात. तर ढसाळांच्या कवितेत वर्गीय–वर्णीय जाणिवा जबाबदार ठरविल्या जातात. कोलटकरांच्या कवितेत आजच्या माणसाचे किडा–मुंगीगत मरण सहजभावातून स्वीकारले जाते. तर ढसाळ यांच्या कवितेत मृत्यूविषयीचा असा सहजभाव नाकारून त्याविरुद्ध बंड करण्याची भाषा येते आणि आरती प्रभूंच्या कवितेत मृत्यू हा नियतीचे खेळणे म्हणूनच येतो. म्हणजेच 'मृत्यू' ही एकच घटना असली तरी प्रत्येक कवी आपापल्या प्रकृतिधर्मानुसार मृत्यूचे आकलन–अवलोकन करून चिंतन व्यक्त करतो. यातून साठोत्तरी काळातील कवी आजच्या आधुनिक माणसाच्या जगण्याची आणि मरण्याचीही विडंबना प्रस्तुत करतात.

**डॉ. प्रतिभा टेंबे**

●●●

दुःख विभागल्याने कमी होते आणि सुख विभागल्याने वाढते.

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**अभिनंदन**

**दिवाळी हवी, फटाके नको!**

'फटाक्यांचा वापर टाळा, तरच बसेल प्रदूषणाला आळा', अशा स्वरुपाचा संदेश आपल्या शुभेच्छापत्रातून प्रभावीपणे देणाऱ्या कु. ऋचा जोशी हिचे अभिनंदन!

दिवाळी म्हणजे आनंद व उत्साहाचा सण. तो सर्वांनी मिळून साजरा करायला हवा. या आनंदाच्या वातावरणात फटाके फोडून प्रदूषण वाढवायला नको याची जाणीव लहान वयातच मुलांना होत असल्याची प्रचीती आली ती 'Live School' या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या शुभेच्छापत्र बनवण्याच्या स्पर्धेतून. 'मी मराठी' या द्वारे ही स्पर्धा घेण्यात आली. इ. ५ वी ते १० वी च्या गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत 'फटाके म्हणजे पैशाचा धूर' हा प्रतिकात्मक संदेश देणाऱ्या आपल्या शाळेतील इ. ७ अ मधील कु. ऋचा जोशी हीने चौथा क्रमांक मिळवला.

'मी मराठी' तर्फे झालेल्या बक्षीस समारंभात कु. ऋचा जोशी हिला आदिनाथ कोठारे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास दुसऱ्या पुनर्मूल्यांकनात नॅक समितीकडून 'अ' दर्जा**

विद्या प्रसारक मंडळ संचालित बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास दि. ५ ते ७ ऑक्टोबर २०१५ रोजी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृत परिषदेच्या (NAAC) प्रतिनिधी मंडळाने महाविद्यालयाचे द्वितीय पुनर्मूल्यांकन करण्यासाठी भेट दिली होती.

सदर भेटीचा निकाल राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाला असून त्यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास 'अ' दर्जा बहाल केला आहे. महाविद्यालयाने आपला पहिल्या पुनर्मूल्यांकनात मिळालेला 'अ' दर्जा कायम राखत ३.२१ इतके गुण प्राप्त केले आहेत. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी नॅकचे संचालक व समिती, विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे मान्यवर मार्गदर्शक, मंडळाच्या संस्थांचे प्राचार्य, उपप्राचार्य व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक, सर्व हितचिंतक व नॅक समितीच्या भेटी दरम्यान ज्यांनी ज्यांनी सक्रीय मदत केली त्या सर्वांचे हार्दिक आभार मानले. सर्वांच्या मदतीमुळेच महाविद्यालयाने अपेक्षित यश मिळविले आहे असे त्या म्हणाल्या.

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**राष्ट्रीय सामाजिक ऐक्य पंधरवडा**

दिवंगत पंतप्रधान मा.राजीव गांधी यांचा जयंती दिवस २० ऑगस्ट हा दरवर्षी 'सद्भावना दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात 'राष्ट्रीय सामाजिक ऐक्य पंधरवडा' साजरा करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयीन परिसरात व पटांगणात सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिच्यात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीवर्गाने मोठ्या प्रामाणात सहभाग घेतला. वरिष्ठ

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सद्भावना गीत सादर केले व दिनांक १ सप्टेंबर रोजी महाविद्यालयीन परिसरात एका भव्य मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते.

### 'शिक्षक दिना' चा जागर

५ सप्टेंबर हा संपूर्ण भारतात शिक्षकदिन म्हणून साजरा करण्यात येतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणून तो सर्वज्ञात आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात अकरावी विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी आपल्याला ज्या विषयात गती आहे त्या विषयाचे २०- २० मिनिटांचे व्याख्यान घेऊन एका अनोख्या पद्धतीने शिक्षकदिन साजरा केला. वेळापत्रकाप्रमाणे प्रत्येक वर्गाचे स्वतंत्र वेळापत्रक ठरवणे, त्यांच्या तासिकांमध्ये कुठेही खंड न पडता व कुणावरही ज्यादा कार्यभार न देता व्यवस्थित व सुटसुटीत व्याख्यानांची आखणी करणे, आणि शिकवण्यास दिलेला विषय वेळेत संपविणे हे सर्व प्रशासकीय कामकाजही विद्यार्थीच पाहात होते. शिक्षक दिन म्हणजे फक्त सादरीकरण नसून तो एक संस्कार व सांस्कृतिक भाग असतो. भावी पिढीला हा वारसा जतन करून ठेवायला हवा.

भारतात गुरू-शिष्य परंपरा फार पुरातन काळापासून असून आपण एकप्रकारे आपल्या गुरूजनांना अभिवादन करण्याचाच हा प्रतिकात्मक प्रयत्न आहे.

### वाचन प्रेरणा दिन

दि. १५ ऑक्टोबर हा डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून शासनातर्फे घोषित होण्याची ही पहिलीच वेळ. या दिनाचे औचित्य साधून बा.ना. बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रंथालयामध्ये डॉ. अब्दुल कलामांच्या गाजलेल्या पुस्तकांचे एक प्रशस्त दालन प्रदर्शित करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. याप्रसंगी अनेक मासिके व नियतकालिके विद्यार्थी व शिक्षकांना विनामूल्य देण्यात आली. मराठी, इंग्रजी व विद्या प्रसारक मंडळाने प्रकाशित केलेल्या 'दिशा' अंकांसारखी सर्जनशील व बुद्धिला प्रेरणा देणारी ही नियतकालिके वाचकांनी वाचलीच पाहिजेत अशी होती.

अशा प्रदर्शनातून नव-वाचकांना वाचनाची प्रेरणा मिळते व यातूनच एक चोखंदळ वाचकवर्ग तयार होतो आणि वाचनाची चळवळ तयार होते, असे प्रतिपादन ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी यावेळी केले.

'ग्रंथ तुमच्या दारी', 'ग्रंथपेटी योजना' यासारख्या उपक्रमांतून बांदोडकर विज्ञान महाविद्यालय वाचनाची चळवळ सतत कार्यरत ठेवत असते व त्यातूनच उद्याची दक्ष व सर्जनशील पिढी घडणार आहे असे मत प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी व्यक्त केले.

### ''लडाखचे सौंदर्य'' डॉ. माधुरी पेजावर यांचे व्याख्यान

लडाख म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर येते ते म्हणजे ''निसर्ग सौंदर्य''. लडाख येथील निसर्ग सौंदर्याबरोबरच तेथे असणारे वन्यजीव, स्थलांतर करणारे पक्षी हे देखील तिकडचे आकर्षण आहे.

भारताच्या या सौंदर्याने ओतप्रोत भरलेल्या ठिकाणाची सर्वसामान्य लोकांमध्ये प्रसिद्धी होण्याकरता विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि समाजसेवी संस्था 'होप', यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ऑटोबर २०१५ रोजी **''लडाखचे सौंदर्य''** या विषयावर **डॉ. माधुरी पेजावर** यांचे व्याख्यान महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

---

समाधानी राहण्यातच आयुष्यातलं सगळ्यात मोठं सुख आहे.

## अभिनंदन

रसायनशास्त्र विभागातील प्रा. प्रकाश माळी यांचा विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग होता व त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. ते पुढील प्रमाणे –

१. ‘युवा महाराष्ट्र सामाजिक मंच, मुंबई’ यांच्यावतीने ‘‘महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०१५’’ बहाल करण्यात आला.

२. ‘ऑल इंडिया रेल्वे शु शाईन वर्कर्स युनियन’ यांच्यातर्फे ‘‘संत शिरोमणी रोहिदास महाराज आदर्श शिक्षक पुरस्कार २०१५’’ प्रदान करण्यात आला.

३. ‘लोकसत्ता गणेश उत्सव मूर्ती स्पर्धा २०१५’ या स्पर्धेतील प्राथमिक फेरीचे परीक्षण आणि प्रतिनिधीत्व केल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आले.

४. दि.१० व ११ ऑगस्ट २०१५ रोजी जोशी बेडेकर महाविद्यालय भाषा विभाग यांच्यावतीने अयोजित करण्यात आलेल्या ‘दैनंदिन भाषा व्यवहार अणि मराठी शुद्धलेखन’ या विषयाच्या कार्यशाळेत सहभाग घेतल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

डॉ. अशोक पाटील, संख्याशास्त्र विभाग यांना ‘ठाणे महानगरपालिका, ठाणे’ यांच्यावतीने ‘‘ठाणे गुणीजन पुरस्कार २०१५’’ प्रदान करण्यात आला.

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर महाविद्यालयातील कु. राहुल खरे व कु. यश मोरे या विद्यार्थ्यांनी पर्यावरण दक्षता मंडळातर्फे पर्यावरण शाळा आयोजित, ‘‘निसर्ग मेळा कोल्हा महोत्सव २०१५’’ च्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत तिसरा  क्रमांक मिळविण्याचा मान मिळविला आहे.

## तंत्रनिकेतन

**प्रा. सौ. गीताली इंगवले यांना राजस्थानच्या जे. जे. टी. विद्यापीठातून पीएचडी प्रदान.**



विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात सौ. गीताली इंगवले ह्या वरिष्ठ प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्या ह्युमेनिटिज ॲन्ड अप्लाइड सायन्स विभागात बऱ्याच वर्षांपासून ज्ञानदान करीत आहेत.

विद्यार्थीप्रिय असलेल्या प्रा. सौ. गीताली इंगवले यांना २१ जुलै २०१५ रोजी राजस्थानच्या जे. जे. टी. विद्यापीठाकडून रसायनशास्त्र विषयात पीएचडी प्रदान करण्यात आली. 'Lantadene : Nano informatics approch towards chemotheraphy of life' हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. त्यांना डॉ. सौ. अनिता गोस्वामी–गिरी यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. गीताली इंगवले ह्या विद्या प्रसारक मंडळाच्या बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी आहेत. त्यांनी देश – विदेशात शोध निबंध सादर केले आहेत. 'Advanced Chemistry' : ह्या ग्रंथाचे लेखन ही त्यांनी केले आहे. पुण्याच्या एव्हरेस्ट प्रकाशनाद्वारे हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे.

वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ISTE चॅप्टरच्या प्रमुख म्हणून त्या बरेच वर्षे काम पाहतात. ह्याच अग्रगण्य संस्थेद्वारे त्यांना ‘सर्वोत्तम तंत्रनिकेतन शिक्षक’ (महाराष्ट्र – गोवा – २०१४) म्हणूनही पुरस्कार प्राप्त झालेला आहे. अत्यंत खडतर मेहनत घेवून त्यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य दि. कृ. नायक, विभाग प्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्ग इत्यादींकडून अभिनंदन होत आहे.

**TEectro - Evolution** – २०१५

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई (MSBTE) दरवर्षी तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करीत असते. याही वर्षी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने तंत्रनिकेतनच्या अंतिम वर्ष विद्युत (मुंबई आणि पुणे विभाग) विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी पेपर सादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या तंत्रनिकेतनच्या संस्थांमधून विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे येथील इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम (EPS) विभागास स्पर्धा आयोजित करण्यासाठी निवडले. सदरची ही राज्यस्तरीय पेपर सादरीकरण स्पर्धा दि. ८ ऑक्टोबर २०१५ रोजी तंत्रनिकेतनच्या A.V. रूम येथे संपन्न झाली.

'Electro - Evolution - 2015' राज्य स्तरीय पेपर स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकरिता खालील विषय देण्यात आले होते.

- Modern speed control Technology For A.C. Motors.
- Smart grid - Future grid
- Nano - generator
- Energy - Future Fuel soruce / technology
- Wireless system of circuit breaker for safety Maintenance
- Mordern surge arrestors etc.

ही स्पर्धा आयोजनामागचा उद्देश पुढीलप्रमाणे –

१) सर्व अंतिम वर्ष तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्यासोबत व्यक्तिमत्त्व व विकास इत्यादी गुणांमध्ये नैपुण्य मिळावे यासाठी त्यांना व्यासपीठ मिळवून देणे.

२) तरुण अभियंत्यामध्ये विद्युतक्षेत्रामध्ये होणारे नवनवीन बद्दल वीजनिर्मिती आणि वितरण यामध्ये येणारी आधुनिकता याबाबत जागृती निर्माण करणे आणि त्यांची मते जाणून घेणे.

वरील उद्दिष्टांना अनुसरून कार्यक्रमाची आखणी केली होती. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई या अग्रगण्य संस्थेचे प्रायोजकत्व लाभले होते. मुंबई आणि पुणे विभागातील विविध तंत्रनिकेतनांमधून एकूण वीस पेपरर्स प्राप्त झाले. हे पेपर पडताळणीसाठी निवड समितीकडे पाठविण्यात आले. सदर समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश होता.

**निवड समिती**

| | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १) | प्रा. दि. कृ. नायक<br>प्राचार्य वि. प्र. मंडळाचे<br>तंत्रनिकेतन, ठाणे | प्राचार्य<br>organining<br>Institute |
| २) | डॉ. एच. ए. मंगळवेढेकर<br>प्रा. विद्युत विभाग<br>वीर जिजामाता टेक्निकल<br>इन्स्टिट्यूट, मुंबई | MSBTE<br>प्रतिनिधी |
| ३) | सौ. वाणी जयराम<br>सिलेक्शन ग्रेड प्राध्यापिका<br>इंस्ट्रुमेंटेशन विभाग BVIT<br>खारघर, नवी मुंबई | सदस्य |
| ४) | सौ. मिनी विश्वनाथन<br>सिनिअर अध्यापिका<br>मुच्छाला तंत्रनिकेतन, ठाणे. | सदस्य |
| ५) | सौ. सुषमा कुलकर्णी<br>सिनिअर अध्यापिका<br>वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन,<br>ठाणे | सदस्य |

वरील समितीच्या पडताळणीमधून उत्कृष्ट १६ पेपर्स सादरीकरण स्पर्धेसाठी निवडण्यात आले होते. हे निवडलेले पेपर्स 'Electro-Evolution - 2015' या स्मरणिकेत प्रकाशित करण्यात आले.

**उद्घाटन अधिवेशन**

सदर कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. एस.एम.एस. शशिधरा, उप-सचिव MSBTE मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात त्यांनी सदर कार्यक्रम आयोजनामागची पार्श्वभूमी सांगितली आणि अशा स्पर्धांमध्ये उदयोन्मुख तरुण अभियंत्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याची गरज बोलून दाखविली.

तंत्रनिकेतनाचे प्राचार्य व सदर कार्यक्रमाचे प्रमुख समन्वयक प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सदर पेपर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे आभार मानले.

इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम विभागाच्या प्रमुख आणि कार्यक्रम सह-समन्वयक प्रा. सौ. निशा वडेर यांनी दिवसभराच्या कार्यक्रमाची रूपरेखा स्पर्धकांना सांगितली. मुंबई आणि पुणे येथील विविध तंत्रनिकेतनच्या प्राचार्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी उद्युक्त केल्याबद्दलही त्यांनी आभार मानले अणि भविष्यामध्ये अशा वेगवेगळ्या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. प्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

**शोधनिबंध सादरीकरण अधिवेशन**

पेपर सादरीकरण अधिवेशनासाठी उष्कृष्ट पेपर निवडण्यासाठी चतुरस्र आणि गुणवान अशा दोन परिक्षकांची निवड करण्यात आली. औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून सलील नेरूरकर (प्रोडक्ट मॅनेजर, मॅरॅथॉन इलेक्ट्रिक मोटार) आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून एम. एम. दीक्षित (विभाग प्रमुख, विश्व निकेतन इंजिनिअरिंग कॉलेज, खामपूर) हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी निवडलेले विषय माहिती संकलन सादरीकरण कौशल्य आणि उपस्थितांच्या प्रश्नांची उत्तरे व सर्वसाधारण एकूण प्रगती इत्यादी गुणांच्या आधारे उत्कृष्ट पेपर निवडण्याचे कौशल्य परिक्षक तज्ज्ञांनी पार पाडले. उदयोन्मुख तरुण अभियंत्यांनी चांगल्याप्रकारे सादरीकरण केले. त्यामध्ये स्मार्ट ग्रेड-फ्युचर ग्रिड, वायरलेस सिस्टिम ऑफ सर्किट बेकर फॉर मेंटेनन्स् व नॅनो जनरेटर इत्यादींचा समावेश होता. विद्यार्थ्यांचे सादरीकरण कौशल्य आणि माहिती संकलनाचे तज्ज्ञांनी खूपच कौतुक केले.

**तज्ज्ञांनी निवडलेले विजेते विद्यार्थी आणि पेपर्स खालीलप्रमाणे :-**

| पारितोषिक | पेपर शीर्षक | विद्यार्थ्यांचे नाव | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | वायरलेस सिस्टिम ऑफ सर्किट ब्रेकर फॉर मेंटेनन्स् | निधी शेट्टी<br>सफलता पिंपळे | वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे |
| द्वितीय पारितोषिक | Future technology in illumination Engineering | मोहित राठोड<br>शैलेश रायानी | एस. बी. एम. तंत्रनिकेतन, मुंबई |
| तृतीय पारितोषिक | Smart - grid<br>Future grid | स्मिताली देशपांडे<br>ऋतुजा बच्चे | अशोकराव माने तंत्रनिकेतन, वाठार |

हळवेपणा बाजूला ठेवा. वास्तवाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा - भगतसिंग

## आभार प्रदर्शन

Electro - Evolution - 2015 या कार्यक्रमाच्या बक्षिस वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एच. ए. मंगळवेढेकर (प्राध्यापक विद्युत विभाग, VJTI, मुंबई) हे उपस्थित होते. वरील सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देवून गौरविण्यात आले. मुंबई आणि पुणे विभागातून आलेल्या स्पर्धकांचे त्यांनी कौतुक केले. शिवाय प्रयत्नपूर्वक आणि माहितीपर सादरीकरणासाठी त्यांनी विशेष दाद दिली आणि माहिती-संकलन आणि सादरीकरण कौशल्यामध्ये उत्कृष्टता येण्यासाठी मोलाचे सल्ले दिले. यानंतर परिक्षकांनीही विद्यार्थ्यांना काही महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या आणि भविष्यात तंत्रनिकेतन कार्यक्रम आयोजित करताना औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्याचे सूचित केले. यानंतर काही स्पर्धकांनी दिवसभराच्या कार्यक्रमाबद्दल आपली मते व्यक्त केले आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ आणि विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन या दोन्ही संस्थांनी हा संयुक्त कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आभार मानले.

सौ. सुषमा कुलकर्णी (प्राध्यापिका EPS विभाग) यांनी आभार प्रदर्शन केले. MSBTE आणि कार्यक्रम आयोजन करण्यासाठी प्रोत्साहित केल्याबद्दल प्राचार्य दि. कृ. नायक यांचेही विशेष आभार व्यक्त केले. याशिवाय निवड समिती तज्ज्ञ, परिक्षक तज्ज्ञ विभाग प्रमुख व कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. सौ. निशा वडेर तसेच संपूर्ण इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम डिपार्टमेंट यांचे आभार मानले आणि संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### पुरवठा साखळी आणि माहिती तंत्रज्ञान परिसंवाद

आजच्या एकंदरीतच उद्योग जगतातील मागणी-पुरवठा तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या युगात नेमके काय आवश्यक आहे, याची माहिती करून देण्यासाठी ठाण्याच्या डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेत व्यवस्थापकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांतर्फे शनिवार दि. २८ नोव्हेंबर २०१५ रोजी 'ग्लाईड' या शीर्षकासह 'पुरवठा साखळी (Supply chain) आणि माहिती तंत्रज्ञान (Information Technology) कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत पुरवठा साखळी तसेच त्यासाठी उपयुक्त आणि पुरक अशा माहिती तंत्रज्ञानासंबंधी अनेक पैलूंवर माहिती देण्यासाठी उद्योग जगतातून अनेक नामांकित तज्ज्ञ हजर होते.




**Operations and IT Students Committee**

संस्थेचे संचालक डॉ. नितीन जोशी हे विद्यार्थांना मार्गदर्शन करताना म्हणाले, 'माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कोणताही उद्योग सहज ग्राहक केंद्रित होऊ शकतो. आजच्या युगात पुरवठ्यापेक्षा मागणी व्यवस्थापन जास्त महत्त्वाचे असून व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थांनी या विषयाचा खोलवर अभ्यास करायला हवा.'

यानंतर उद्योग जगतातील नामांकित तज्ज्ञांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. संतोष कारखानीस यांनी 'SAP या ERP सॉफ्टवेअरची अंमलबजावणी आणि सुयोग्य वापर कसा करावा, त्याचे फायदे आणि त्यातील विविध विभाग' यांवर मार्गदर्शन केले. तसेच SAP च्या उत्क्रांतीबद्दलही माहिती दिली.




**Guest Speakers from Industry**




**डॉ. राहुल अलटेकर**

डॉ. राहुल अलटेकर यांनी पुरवठा साखळीचा इतिहास उलगडून सांगत MRP (Material Resource Planning) ते SAP(System applications Products) पर्यंतचा प्रवास उलगडला. आजच्या युगात संक्रमण हे उपयुक्त आहे आणि पुरवठा साखळीचे संक्रमण होणे ही काळाची गरज आहे, आणि या सगळ्यात माहिती तंत्रज्ञानाचा वापर म्हणजेच अचूकता असंही ते म्हणाले.

श्री. श्यामसुंदर यांनी 'मागणी आणि पुरवठा साखळी, वाहतूक-व्यवस्था यातील आव्हाने' याविषयी माहिती दिली. निरनिराळ्याप्रकारे ग्राहकांची मागणी पूर्ण कशी करता येते, त्याला जोडून निरनिराळ्या मूल्य धोरणांची आणि जाहिरातींची आवश्यकता कशी भासते, त्यासोबतच ग्राहकांच्या मागण्या पूर्ण करताना पुरवठा साखळीची क्षमता कशी असावी इत्यादी गोष्टींवर श्री. श्यामसुंदर यांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले.

'२०२५ साली भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला देश असेल, आणि आजच्यापेक्षा कैक पटींनी येथे महानगरे असतील. आज भारतात १७० प्रकारची वाहने आहेत, परंतु २०२५ साली भारतात ६७० प्रकारची वाहने दृष्टीस पडतील. यावेळी भारत हा निर्यातीचे प्रमुख केंद्र बनेल' असे बिपिन रघुनाथन म्हणाले. 'एखादी उद्योगसंस्था ते ग्राहक' यांच्यातील साखळी उलगडून सांगताना, 'आजची प्रक्रिया ही मागणीचा अंदाज घेण्याची आहे; परंतु आणखी दहा वर्षांनंतर मागणी अचूकपणे जाणून घेण्याची क्षमता आपल्याकडे असेल' असंही ते म्हणाले.

या कार्यशाळेचे आयोजन करण्यात बेडेकर महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राध्यापक, आणि ऑपरेशन्स-आयटीच्या विद्यार्थांचा सहभाग होता. अशाच कार्यशाळा भविष्यातही आयोजित केल्या जाव्यात अशी अपेक्षा सर्व तज्ज्ञांनी व्यक्त केली. याप्रसंगी व्यवस्थापकीय विषयांशी संबंधित निरनिराळे कार्यक्रम आणि बक्षिस समारंभही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडला.

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
***०२२-२५४२ ६२७०***

आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही.

(पृष्ठ क्र. २ वरून – **संपादकीय**)

mother-tongue-he does not know it. He is indeed a stranger in his own land." (Modern Review, Calcutta, Vol.4. Oct. 1908 p.338)

अलीकडे पार्थ मित्तर (Parth Mitter) यांनी आपल्या Much maligned Monster - A History of European Reactions to Indian Art या १९७७ साली प्रकाशित केलेल्या पुस्तकामध्ये या मानसिकतेचा विस्तार आणि ऊहापोह केला आहे. या पुस्तकाच्या पहिल्या पाठातच ते म्हणतात,–

"Why did Hindu art, and the treatment of Hindu figure sculpture and iconography in particular, present such problems of assimilation? In order to seek the answer to his question it is necessary to go beyond the eighteenth and ineteenth centuries and back to the end of Middle Ages, because in essence that was when attitudes were formed and the germs of later reactions firmly planted. The period from the middle of the thirteenth to the end of the seventeenth century may be regarded as the formative phase in the reception of Indian art."

आपल्या सगळ्याच कलांवरती आज काही शेकड्यांनी हस्तलिखिते उपलब्ध झाली आहेत. भरताचे 'नाट्यशास्त्र' हे तर सगळ्यांनाच ज्ञात आहे. स्थापत्यावर मत्स्यपुराणामध्ये १८ संहिता असल्याचे नोंदवले आहे. त्यातल्या बहुतेक संहिता आज जरी उपलब्ध नसल्या तरी कश्यप, भृगु, मय व विश्वकर्म या संहिता आजही उपलब्ध आहेत. शिल्पकार या साहित्याचा वापर करून वेगवेगळ्या शैलींनी अगदी पेशवाईपर्यंत मंदिर बांधत होते. कृष्णाजी विनायक वझे यांनी आपल्या ''हिंदी शिल्पशास्त्र'' या पुस्तकामध्ये नाशिकच्या मंदिरांचे उदाहरण देऊन ही गोष्ट स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, –

''राजे बहादूर नारोशंकर यांनी बांधलेले महादेवाचे देऊळ कश्यप संहितेप्रमाणे आहे. चंद्रचूड यांनी बांधलेले सुंदरनारायणाचे देऊळ भृगुसंहितेप्रमाणे आहे, व ओढेकर यांनी बांधलेले काळ्या रामाचे देऊळ मयसंहितेप्रमाणे आहे.''

आज भारतभर प्राचीन मंदिर किंवा गुंफा विखुरलेल्या आहेत. तत्कालिन जीवनशैलीचेच ते प्रतिबिंब आहे. केशभूषा, वेशभूषा ते दैनंदिन वापरातील अनेक गोष्टींचे प्रतिबिंब त्यामधून उमटले आहे. पण मंदिर बघावे कसे? हे आपल्या शालेय शिक्षणाचा एक लहानसा भागही होऊ शकत नाही हे मोठे दुर्दैव आहे.

चित्रकलेला मार्गदर्शक 'चित्रसुत्रां'वरती विष्णुधर्मोत्तर पुराण, बृहद्संहित्ता, समरांगण सूत्रधार ते सोमेश्वराच्या १२ व्या शतकातील मानसोल्लासामध्ये विस्ताराने चर्चा आहे. पण हे साहित्य कला शिक्षणामध्ये फारसे अंतर्भूत नाही. चित्रकलेचा अगदी सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे नागनाजीत यांचे 'चित्रलक्षण'. हा मूळ संस्कृत ग्रंथ सध्या उपलब्ध नाही. याचे तिबेटी भाषेतील भाषांतर मात्र आज उपलब्ध आहे. बर्थहोल्ड लॉफर (Berthold Laufer) या पाश्चात्य अभ्यासकाने तिबेटियन हस्तलिखिताचे संपादन करून त्याचे जर्मन भाषेमध्ये भाषांतर केले. त्याच्या इंग्रजी भाषांतराकरता मात्र अभ्यासकांना १९७६ पर्यंत थांबावे लागले.

आज संस्कृतभाषेचे शब्दकोश उपलब्ध आहेत. पण 'कला' किंवा 'शास्त्रां'च्या साहित्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या संस्कृत शब्दांचा, त्या संदर्भातील अर्थ सांगणारे शब्दकोश आज उपलब्ध नाहीत. Indira Gandhi National Centre for the Arts या संस्थेने अलीकडे 'कलामूलशास्त्र' (Root texts on the Arts) हा खंडात्मक ग्रंथ प्रकाशित करायला सुरुवात केली आहे. या प्रकल्पावरती विचार मांडताना Bettina Sharada Baumer यांचे निरीक्षणही फार महत्त्वाचे आहे.

"The question is, how do we understand and interpret these art-forms? Shall it be in terms of Western Categories and terminologies as has been the case for long with art history? Indian culture as expresseed in its Sanskrit literature is perhaps the richest in the world by way of theoretical reflection on any aspect of art, not to mention other disciplines. It is therefore high time to interpret the various manifestations and cultural expressions in terms of their own tradition. Therefore a through presentation of the main sources for understandin the Arts is essential."

'याचना' करून स्वातंत्र्य मिळत नसते, तसेच 'विनंती' करून न्यायही मिळत नसतो. याबाबतीत चीनचे उदाहरण घेण्यासारखे आहे.

२००९ मध्ये Yves Saint Laurent (YSL) या जगप्रसिद्ध फॅशन डिझायनरनी जमवलेल्या प्राचीन वस्तूंचा फ्रान्समध्ये लिलाव झाला. त्यामध्ये १८६० च्या सुमाराला फ्रेंच सैनिकांनी लुटलेल्या २ वस्तूंचा समावेश बेजिंगच्या समरपॅलेसमध्ये होता. या वस्तू चीनच्या 'कला' आणि 'सांस्कृतिक' वारसा असल्यामुळे त्या वस्तूंचा लिलाव न करता त्या चीनला परत द्याव्यात अशी चीनी सरकारने विनंती केली. अर्थातच ती फेटाळण्यात आली. या लिलावामध्ये एका चीनी व्यापाऱ्याने ४ कोटी डॉलर्सची बोली त्या वस्तूंकरता लावली, आणि त्या वस्तूंचा लिलाव त्याच्या बाजूने झाला. हा लिलाव हाच चीनी संस्कृती आणि कलेचा अवमान असल्यामुळे, आपली आर्थिक क्षमता दाखवून दिल्यावर ते पैसे देण्याचे मात्र त्याने नाकारले. पुढे या वस्तूंचा पुन्हा लिलाव झाला, आणि फ्रान्समधीलच फॅशन डिझाईनमध्ये काम करणाऱ्या पिनॉल्ट (Pinault) कुटुंबीयांनी त्या वस्तू विकत घेतल्या. सध्या सधन चीनी लोकांचा जगामधील 'चंगळवादी' वस्तू विकत घेण्याकडे बराच मोठा कल आहे. अशा सगळ्या व्यापाऱ्यांनी चीनमध्ये दुकाने थाटली असून तिथे ते कोट्यवधी रुपयांचा व्यापारही करतात. पिनॉल्ट यांच्या कंपनीलाही चीनी ग्राहक वर्ग मोठा आहे. याच व्यापाराकडे दृष्टी ठेऊन पिनॉल्ट यांनी या दोन चीनी वस्तू चीनी सरकारला परत केल्या, आणि सध्या त्या चीनच्या राष्ट्रीय संग्रहालयात ठेवल्या गेल्या आहेत. ही झाली 'महासत्ते'ची खरी ताकद.

कलांच्या बाबतीततरी भारत हा एक 'महासत्ता' होता. जीवनाचे असे एकही अंग नाही की, ज्यामध्ये भारतीयांनी कलेचा विचार केला नाही. त्यामध्ये मंदिरांच्या भिंती काय, किंवा अजंठा-वेरुळची चित्रे काय, वेशभूषा, केशभूषा, अलंकारांपासून सर्वत्र कला 'प्रतिभा' ओसंडून वाहतांना दिसते. एका 'संपन्न' आणि 'उन्नत' समाजाचेच ते प्रतिबिंब आहे. तत्कालीन साहित्य आणि शिल्पांमध्येही त्याचे चित्रण स्पष्टपणे दिसून येते. भारतीय संस्कृतीची ही कायम स्वरुपी 'प्रदर्शने' आहेत.

सुधारणा, प्रगती किंवा आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्यीकरण असा एक दृढ समज झाला आहे. 'सोय' आणि 'व्यापारीकरणा'ला या प्रक्रियेत कलेपेक्षा वरचे स्थान असते. 'विचित्रपणा', अगदी केसापासून वेशापर्यंत, म्हणजे 'नावीन्य' या कल्पनेमुळे कलेमधील प्रतिभेचे सपाटीकरण झाले आहे. कपड्यांचे 'जिन'करण आणि संगीतातील 'फ्युजन'ने प्रतिभे प्रमाणेच अभिरुचीचेही तीन तेरा वाजवले आहेत. 'प्लेबॉय' मधील रुचीहीन नागडेपणा, आणि सिनेमापासून रस्त्यावर दिसणाऱ्या 'दीर्घ' चुंबनांनी शृंगारकला ही किती नासवून टाकली आहे हे समजावून घ्यायचे असेल, तर वात्सायनाचे 'कामसूत्र' वाचणे आवश्यक आहे. अतिरेकी लिंग पिसाटगीरी पेक्षा 'शृंगार' हा सुद्धा रसिकतेने आस्वादायची कला आहे, हे त्याशिवाय कळणार नाही.

ज्या भारतीय संस्कृतीने जीवनाच्या प्रत्येक अंगाला छेदून जाणाऱ्या १४ विद्या आणि ६४ कलांची निर्मिती केली, ती 'दृष्टी' आणि 'विचारांची' मशागत करणारे सामाजिक 'संदर्भ' आणि 'संस्थां'ची सुधारणा किंवा प्रगतीच्या नावाखाली मोडतोड करणे, म्हणजे 'सृजन' आणि 'कलाप्रतिभेला' सोडचिठ्ठी देण्यासारखेच आहे. कलेचा रसास्वाद घेण्याकरता चोखंदळ अभिरुचीचा 'रसिक' निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या देऊळांपासून सणांपर्यंत केला जात होता. म्हणूनच राजकारण्यांनी आपल्या सणांचे आज केलेले विकृतीकरण क्लेशकारक आहे.

कला निर्मितीची क्षमता ही राष्ट्राची खरी ताकद असते. स्वातंत्र्याला ६८ वर्षे होऊनही आज भारतामध्ये हस्तलिखित, पुस्तक, आणि प्राचीन देऊळे आणि वस्तूंची मोठी हेळसांड होत आहे. शिक्षणामध्ये यांच्या अभ्यासाला अजिबात स्थान नाही. अशा प्रकारची ग्रंथालये किंवा संग्रहालयांचा होऊ घातलेल्या स्मार्ट सिटीमध्ये विचारसुद्धा नाही. हीच आपली खरी शोकांतिका आणि मोठे दुर्दैव आहे. भौगोलिक वसाहतवाद संपला असला तरी कला आणि सांस्कृतिक वसाहतवाद अनिर्बंदपणे चालू आहे. अर्थातच याला जबाबदार आपण सगळेच आहोत.

**डॉ. विजय बेडेकर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.